रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २२३
www.ramprahar.com

◆ रविवार, १ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

गोवंश मांस वाहतूक करणाऱ्या वाहनासह चौघे ताब्यात/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघ उपविजेता/८

## अमेरिकेच्या मदतीने इस्त्रायलचा हल्ला; इराणकडूनही पलटवार



**तेहरान, जेरूसलेम** : इस्त्रायलने अमेरिकेच्या मदतीने शनिवारी (दि. २८) इराणवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर इराणनेही प्रत्युत्तरात इस्राईलवर क्षेपणास्त्रे डागली तसेच आखाती देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला केला. इस्त्रायली हवाई दलाने इराणमधील अनेक ठिकाणांवर हल्ला केला. तेहरानमध्ये अनेक स्फोट ऐकू आले. हल्ल्यानंतर इस्त्रायलने राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केली आहे. इराणनेदेखील इस्त्रायलवर पलटवार केला आहे. इराणने इस्त्रायलवर ७० बॅलेस्टिक मिसाईल सोडले. इराणने फक्त इस्त्रायलवर प्रतिहल्ला केला नसून तब्बल सात देशातील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला केला आहे. यात बहरीन, कतार, युएई, सौदी अरेबिया, जॉर्डन, कुवैत या देशातील अमेरिकेच्या लष्करी तळांचा समावेश आहे. दरम्यान, या युद्धामुळे अनेक ठिकाणची विमानसेवा बंद करण्यात आली आहे.



# खारघरमध्ये भक्ती, सेवा आणि एकात्मतेचा संगम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमाला खारघर ओवे सेक्टर १९ येथील मैदानावर शनिवारी (दि.२८) प्रारंभ झाला. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. या दोन दिवसीय भव्य समागमात भक्ती, सेवा आणि सामाजिक एकात्मतेचे अद्वितीय वातावरण अनुभवायला मिळत आहे.

कार्यक्रमात सकाळपासून गुरूबाणी, कीर्तन, पाठ, धार्मिक प्रवचन, आरोग्य शिबिर, शस्त्रास्त्र प्रदर्शन, महिलांचे पारंपरिक नृत्य आदींचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. देशभरातून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीमुळे परिसर पूर्णपणे आध्यात्मिक रंगात न्हाऊन निघाला आहे. समागमस्थळी अखंड कीर्तन सुरू असून वाहे गुरू आणि बोले सो निहाल, सत श्री अकालच्या



(अधिक छायाचित्रे पान ८ वर...)

जयघोषाने वातावरण भारावून गेले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपमहापौर प्रमिला पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, स्वप्नील ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी लाखो भाविक उपस्थित होते.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज उपस्थिती

या कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची रविवारी (दि.१) सायंकाळी ५ वाजता प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, विविध खात्यांचे मंत्री यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### गुरू तेग बहादुर यांच्या शहिदी समागमाला प्रारंभ

### मान्यवर मंडळींसह भाविकांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम

या समागमात सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीयम, उदासीन तसेच संत नामदेव महाराजांच्या वारकरी (भगत नामदेव) संप्रदायातील भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सर्व समाजातील प्रतिनिधींनी उपस्थित राहून एकता, बंधूता आणि मानवतेचा संदेश दिला. बंजारा व लबाना समाजाच्या महिलांनी पारंपरिक नृत्य सादर करून सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडविले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरू ग्रंथ साहिब यांच्या शिकवणीनुसार समता व मानवतेचा विचार अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमस्थळी सर्व समाजांनी परंपरा, संस्कृती आणि धार्मिक मूल्यांचा सन्मान राखत शांततेत सहभाग घेतला. विविध समाजांच्या उपस्थितीमुळे हा समागम केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरला आहे.

समागमात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत विविध तपासण्या व औषधोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डोळ्यांची तपासणी करून मोफत देवाभाऊ चष्मे वाहनातून चष्मे वितरित करण्याची सोयही करण्यात आली आहे.

'विरासत-ए-सीख' या प्रदर्शनातून शीख समाजाचा इतिहास, शौर्यगाथा आणि परंपरा सचित्र स्वरूपात मांडण्यात आल्या आहेत. शीख योद्ध्यांनी वापरलेली शस्त्रे आणि ऐतिहासिक माहिती पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर सेवा सुरू असून सर्व धर्मियांना प्रेमपूर्वक भोजन दिले जात आहे.

## अजितदादांच्या विमान अपघाताचा अहवाल सादर

### डीजीसीएकडून अनेक गोष्टींचा उलगडा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



बारामती येथे विमान लँडिंग करताना झालेल्या अपघात महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी मृत्यू झाला होता. गेला महिनाभर या अपघाताचा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) अधिकाऱ्यांनी तपास केला आणि शनिवारी (दि. २८) अहवाल सादर केला. यामध्ये विमान अपघाताची कारणे देण्यात आली आहेत.

अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघाताबाबतची प्राथमिक माहिती डीजीसीएने २२ पानी अहवालाच्या माध्यमातून मांडली आहे. या अहवालातून समोर आलेल्या माहितीनुसार अजित पवार हे मुंबईहून बारामतीला जात होते. विमाने अपघातग्रस्त होण्यापूर्वी काही काही क्षण आधी एका झाडाला धडकले आणि नंतर जमिनीवर कोसळल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नियमांनुसार विमान उतरवण्यासाठी किमान पाच किमी दृश्यमानता असणे आवश्यक असते, मात्र ज्यावेळी हा अपघात झाला, तेव्हा बारामतीमध्ये दृश्यमानता केवळ तीन किमी इतकीच होती. पुण्याच्या हवामान विभागाने तर त्या वेळी केवळ दोन किमी दृश्यमानतेची नोंद केली. बारामती परिसरात त्या दिवशी धुक्याचे प्रमाण अधिक होते, ज्यामुळे वैमानिकाला धावपट्टीचा अंदाज येण्यात अडचणी आल्या असण्याची शक्यता आहे.

दुर्घटनेनंतर विमानाने पेट घेतल्याने मोठी हानी झाली, ज्यामुळे फ्लाईट डाटा रेकॉर्डरदेखील खराब झाला आहे, पण त्यातील रॉ डाटा डाऊनलोड करण्यात तपास यंत्रणेला यश आल्याचे अहवालातून सांगण्यात आले आहे.

## आंध्रात फटाक्यांच्या फॅक्टरीत स्फोट; १८ कामगारांचा मृत्यू, सहा जण जखमी

**अमरावती** : आंध्र प्रदेशच्या काकीनाडा जिल्ह्यातील वेत्लापलेम गावात असलेल्या एका फटाक्यांच्या कारखान्यात शनिवारी (दि. २८) भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १८ कामगारांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीररीत्या भाजले आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले तसेच जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून बचावकार्याचा आढावा घेतला आणि सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले आहेत.

## 'विकास आणि कल्याणासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करा'



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २८) राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शुभेच्छा देत भारताच्या वैज्ञानिक कामगिरीचा उत्सव साजरा केला. एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून त्यांनी विज्ञान दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर लिहिले आहे की, हा दिवस सर सी.व्ही. रामन यांनी लावलेल्या 'रामन इफेक्ट' या क्रांतिकारी शोधाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. या शोधामुळे भारतीय संशोधनाला जागतिक नकाशावर भक्कम स्थान मिळाले. आपल्या तरुणांना सक्षम बनवण्याचा, संशोधन परिसंस्था अधिक बळकट करण्याचा आणि राष्ट्र विकास तसेच जागतिक कल्याणासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करावा.

तरुण नवोन्मेषकांसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि संशोधनाच्या संधींचा विस्तार करणे यावर सरकारचे सतत लक्ष केंद्रित असल्याचेही पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम येत्या मेअखेर पूर्णत्वास येणार

### मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे विधान परिषदेत आश्वासन

**मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षी होळी आणि गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम आता अंतिम टप्प्यात पोहचले आहे. माणगाव-इंदापूर बायपासचा काही भाग वगळता येत्या मे महिन्यापर्यंत मुंबई-गोवा महामार्गाचे संपूर्ण काम पूर्णत्वास गेलेले असेल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शनिवारी (दि. २८) विधान परिषदेत दिली. भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी हे आश्वासन दिले.



सभागृहात सदस्य निरंजन डावखरे यांनी महामार्गाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सहभाग घेताना आमदार प्रवीण दरेकर यांनी आता होळीचा सण जवळ आला असून अशा वेळी प्रवाशांना हा विहित वेळेत पूर्ण होऊन दिलासा मिळणार का, असा सवाल विचारला. त्याचप्रमाणे महाड येथील गांधारपाले लेणी परिसरात पर्यटन विकासासाठी बांधकाम विभागाने पुढाकार घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

यावर उत्तर देताना मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी कामाचे वेळापत्रक स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, चिपळूणचा महत्त्वाचा पूल मेपर्यंत खुला होईल, तर हातखंबा उड्डाणपुलाचे काम याचवर्षी एप्रिलपर्यंत पूर्ण होत आहे. माणगाव-इंदापूर मार्गाची मुदत २०२७ असली, तरी उर्वरित महामार्ग मे २०२६पर्यंत प्रवासासाठी सज्ज असेल तसेच गांधारपाले लेणी येथे पर्यटन विभागाच्या माध्यमातून आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

## उलवे नोडमध्ये आज महासंस्कृती : जागर स्त्री शक्तीचा सांस्कृतिक कार्यक्रम

### भजनी मंडळांना भांडवली अनुदानाचे होणार वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महासंस्कृती जागर स्त्री शक्तीचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. १) दुपारी १२ वाजता उलवे नोड येथील लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवनात होणार आहे. यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते भजनी मंडळांना भांडवली अनुदान योजनेंतर्गत धनादेश वाटप केले जाणार आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहे. यावेळी त्यांच्यासमवेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, जिज्ञासा कोळी व इतर मान्यवर पाहुणे उपस्थित असणार आहेत.

भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेत स्त्री ही शक्ती, त्याग आणि प्रेरणेचे प्रतीक मानली जाते. महिला लोककलांमध्ये विविध लोकगीत आणि नृत्याचे प्रकार आहेत, ज्यामध्ये पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि नृत्यशैलींचा समावेश असतो. महिलांच्या या कला, कौशल्ये आणि सामाजिक स्थानाला योग्य महत्त्व देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. नृत्य, गीत, नाटिका आणि विविध सादरीकरणांद्वारे स्त्रीशक्तीचा जागर मांडला जाईल.

या कार्यक्रमातून स्त्री सक्षमीकरणाचा संदेश सर्वांपर्यंत पोचविण्याचा उद्देश आहे. कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असून कलाप्रेमींनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे. या वेळी मंत्री ॲड. शेलार यांच्या हस्ते भजनी मंडळांना धनादेश वाटप करण्यात येणार आहे.



# ज्वलनशील, धोकादायक पदार्थांच्या वाहतुकीसंदर्भात विधानसभेत चर्चा

## आदर्श कार्यपद्धती तयार करण्याचे आदेश –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

महामार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित होण्याच्यादृष्टीने ज्वलनशील व तत्सम धोकादायक पदार्थांच्या वाहतूकीसंदर्भात आदर्श कार्यपद्धती एसओपी तयार करण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बोलताना सांगितले.



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटल्याने झालेल्या वाहतूक कोंडीबाबतच्या लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या चर्चेत सदस्य जयंत पाटील, आदित्य ठाकरे यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात पुन्हा कधी अशी दुर्घटना घडून नये यासाठी अशा पदार्थांची वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना यासंदर्भात एसओपी तयार करण्याचे आदेश देण्यात आले असून या पद्धतीच्या आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित उपाय तातडीने करण्यासाठीची रेस्क्यु यंत्रणा, साधनसामुग्री आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे यादृष्टीने यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या संबंधित कंपन्यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून, योग्य मार्गदर्शक सूचना ठरवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बसवण्यात आलेली आयटीएमएस ही प्रणाली सध्या कार्यरत आहे.

या प्रणालीचा उपयोग करून अशा प्रकारच्या अपघाताच्या प्रसंगी माहिती नागरिकांपर्यंत त्वरित पोहोचवता येईल आणि ट्रॅफिकचे व्यवस्थापन, नियंत्रण, तसेच डायव्हर्शन सुकर करता येईल. आयटीएमएसचा उपयोग करून अशा घटनांमध्ये प्रवाशांना तातडीने याबाबतची सूचना देण्यासाठीची ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. जेणेकरून प्रत्येक प्रवाशास अशा पद्धतीच्या परिस्थितीचा संदेश तत्काळ देता येईल, यासाठीची व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात येतील, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

या वाहतूक कोंडीच्या कालावधीत ३६ तासात वसुल करण्यात आलेला टोल हा संबंधित मालकांना परत देण्याचा निर्णय झाला आहे. तसेच इतर प्रगत देशांमध्ये अशा आपत्कालिन परिस्थितीत कोणत्या पद्धतीने तातडीने उपाययोजना राबवण्यात येते याची पडताळणी राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर, ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलिन गॅस वाहतूक करणारा कोची, केरळ येथून सुरत, गुजरात येथे जाण्याकरिता निघालेला टँकर पलटी होऊन त्यामधील ज्वलनशील वायूची गळती सुरु झाली होती. त्यामुळे, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने द्रुतगती महामार्गावरील वाहतुक बंद करण्यात आली होती. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून घटनेबाबत प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमातून माहिती प्रसारित करण्यात आली होती. तसेच हेल्पलाईन क्र. ९८३३४९८३३४ या महामार्ग पोलीस विभागाच्या प्रवाशांच्या मदतीकरीता असलेल्या क्रमांकावर प्राप्त कॉल्सवर घटनेची माहिती तसेच वाहतुकीच्या परिस्थितीची माहिती देण्यात येत होती. ठिकाणी महामार्ग पोलीस, रायगड जिल्हा पोलीस दल, फायर ब्रिगेड, एनडीआरएफ, एसडीएमए, बीपीसीएल, हेल्प फाऊंडेशन, काही केमिकल तज्ज्ञ, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल हे घटना घडल्यापासून वायू गळती रोखून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील होते.

या विषयाबाबत संबंधित अधिकाऱ्यांची १० फेब्रुवारी २०२६ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अनुषंगाने टँकर अपघाताशी संबंधित सर्व बाबींची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी असे निर्देश दिले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

## गोवंश मांस वाहतूक करणाऱ्या वाहनासह चौघे ताब्यात

### खालापूर टोलनाक्यावर कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

बीड येथून मुंबई गोवंडी येथे गोवंश जनावरचे मांस घेऊन जाणारी स्कॉर्पिओ पोलिसांनी खालापूर टोल नाका येथे शनिवारी सकाळी पकडली. गाडीत एक लाख ८० हजार रुपये किंमतीचे सुमारे ६०० किलो गोमांस सापडले असून कासिम शब्बीर शेख (वय ३०, अंबेजोगाई बीड), इन्जमामऊलहक सय्यद, (अंबेजोगाई बीड), सोनू कुरेशी (अहिल्यानगर), सुलेमान फरीद कुरेशी (गोवंडी, मुंबई) या चौघा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून स्कॉर्पिओतून गोवंश जनावराच्या मांसाची वाहतूक होणार असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली होती. त्यानुसार खालापूर टोल नाका येथे सापळा रचण्यात आला. काळी स्कॉर्पिओ टोल नाका येथे आली असता पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न केला, परंतु स्कॉर्पिओ चालकाने गाडीसह पळून जाण्याचा प्रयत्न केला. काही अंतरावर पोलिसांनी पाठलाग करून स्कॉर्पिओ पकडली.

गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये गोवंश जातीच्या जनावराचे मांस आढळून आले. पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सोनू कुरेशी विरुद्ध या अगोदर श्रीरामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## हैदराबादमधील दाम्पत्याच्या दागिन्यांची खालापुरात चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

हैद्राराबाद येथून नातेवाईकांच्या लग्नासाठी खालापूर तालुक्यातील खैराट येथील ओलियंडर फार्म अँड रिसॉर्टमध्ये आलेल्या पवन गजानन अग्रवाल आणि त्यांच्या पत्नीचे १८ लाख ७६ हजार ५०० रुपये किंमतीचे सोन्याचे आणि हिरेजडीत दागिने चोरीला गेल्याची घटना गुरुवार २६ फेब्रुवारी रोजी घडली आहे.

विशाल हे २५ फेब्रुवारी रोजी त्यांचे पत्नीसह नातेवाईकांचे लग्नाकरिता खैराट गावचे हद्दीतील ओलियंडर फार्म अँड रिसॉर्ट मधील रुम नंबर ४७१ मध्ये थांबले होते. त्यावेळी त्यांनी सोन्याचे व हिरेजडीत दागिने व रोख रक्कम रिसॉर्ट मॅनेजमेंटने दिलेल्या लॉकरमध्ये ठेवले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे रुममध्ये प्रवेश करून दागिने चोरून नेले.

याबाबत विशाल यांनी खालापूर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली असून त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे हे करीत आहेत.

## निवडक

### विवाहिता बेपत्ता झाल्याची तक्रार

**पनवेल :** पाणी भरण्यासाठी घरातुन एक विवाहित महिला गेली असता ती परत आली नाही म्हणुन त्यांनी



तिचा सर्वत्र शोध घेतला परतु ती मिळुन न आल्याने ती बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जयश्री जगदिश कातकरी असे या महिलेचे नाव असून वय ३० वर्षे, अंगाने सडपातळ, केस काळे, नाक बसलेले उंची ५ फुट ६ इंच रंग सावळा, डोळे काळे तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीमध्ये जयश्री च जगदिश असे गोंदलेले नेसणीस चॉकलेटी रंगाची चप्पल त्यावर नक्षीकाम असलेली भाषा मराठी आदिवासी, उजव्या डोळयाच्या भाजुस लहानपनी झालेली जखमेची निशाणी गळ्यात मंगळसुत्र घातलेला आहे. सदर महिलेबाबत कोणास अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : पत्रकार मयुर तांबडे यांना वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, अनिल कुरघोडे, सुनील वारगडा, शैलेश चव्हाण आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## टँकरची कारला पाठीमागून ठोकर; क्लिनरचा मृत्यू



**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे दिघी महामार्गावर टँकरची कारला पाठीमागून ठोकर लागून अपघाता झाल्याने या अपघातात टँकर क्लिनरचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, शुक्रवारी रात्री १२.१५ वा. च्या सुमारास तक्रारदार जलाल खान हे त्याचे मालकीची टाटा कंपणीची कार (एमएच ४६ एफ २३८९) हि महाड येथून पुणे येथे जात असताना सणसवाडी गावचे हद्दीतील टी पॉइंट येथे लघवीसाठी थांबवुन पुन्हा गाडी चालु करून पुणे येथे जाण्यासाठी निघत असताना पाठीमागुन येणारा टँकर (एमएच ४८ एजी ५३०७) यावरील चालक स्वप्निल शिंदे याने त्याचे ताब्यातील टँकर तक्रारदार यांच्या कारला पाठीमागुन ठोकर मारून अपघात केला.

या अपघातात टँकर मधील क्लिनर सुशांत अंनत शेळके (वय ३९, रा. इंदापुर) यास लहान मोठ्या व गंभीर दुखापती होवुन मृत्य झाला व दोन्ही वाहनाचे नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. निवृती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. किरवले करीत आहेत.

## चेन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारूंचा धुमाकूळ

**पनवेल : वार्ताहर**

चेन स्नॅचिंग करणाऱ्या मोटरसायकलस्वार लुटारुंनी पनवेल आणि कामोठे परिसरात अक्षरशः धुमाकूळ घातला असून, या लुटारुंनी अवघ्या दोन दिवसांत तीन महिलांच्या अंगावरील तब्बल ११ लाख २० हजार रुपयांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने व मंगळसूत्रे हिसकावून नेल्याच्या घटना घडल्या आहेत.

छाया नामदेव महाडकर या पतीसह करंजाडे सेक्टर-३ येथील सदाबहार नर्सरीजवळ फेरफटका मारत असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुंनी त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा केला. त्यानंतर या लुटारुंनी छाया महाडकर यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाचे, एक लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून पलायन केले. या वेळी झालेल्या झटापटीत छाया महाडकर यांना दुखापत झाली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

दुसऱ्या घटनेत पनवेल शहरातील गोविंद हॉटेलसमोर लता गणेश गोडेकर या पायी चालत जात असताना काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुंनी त्यांच्या गळ्यातील सुमारे सात तोळे वजनाचे, सात लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. तर कामोठे येथे सुधा राजन गुप्ता या पतीसमवेत रिक्षाने खारघरकडे जात असताना मॅकडोनाल्ड्ससमोर दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारूंनी रिक्षाशेजारी येत सुधा गुप्ता यांच्या गळ्यातील अंदाजे ३० ग्रॅम वजनाचे, डायमंड व काळे मणी असलेले सुमारे तीन लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावून नेले. घटनेची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ‘जीएएस’च्या विधी महाविद्यालयात मराठी भाषा दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या (जीएएस) विधी महाविद्यालयात ‘मराठी भाषा गौरव दिन’ आणि ‘शिवजयंती’ संयुक्तपणे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांचा प्रचार व कृतीचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वाभिमानाने जीवन जगावे, असा सल्लाही त्यांनी दिल.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथांवर आधारित पोवाडे सादर केले. तसेच शिवरायांच्या चरित्रावर आधारित व्याख्यानातून त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापिका, शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अश्विणी विणकर या विद्यार्थिनीने केले होते.

## पनवेल महापालिकेतर्फे कुसूमाग्रजांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मुख्यालयात कुसूमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, नगरसचिव तथा उपायुक्त नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर आदी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त महानगरपालिका अंतर्गत सर्व शाळांमध्ये विशेष बालसभांचे आयोजन करण्यात आले.

पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त (शिक्षण) नानासाहेब कामठे, सहायक आयुक्त (शिक्षण) रुपाली माने व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेबद्दल अभिमान, वाचनसंस्कृतीची आवड व भाषिक कौशल्यांचा विकास होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

## पनवेलच्या डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमीमध्ये मराठीचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमी येथे जागर मराठीचा साजरा करत मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. मराठीची समृद्ध परंपरा, साहित्य, संतवाङ्मयाची शिकवण आणि भाषेचे वैभव विद्यार्थ्यांनी सुंदरपणे मांडले.



या विशेष कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष पत्रकार प्रशांत शेडगे यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच विद्यालयाच्या व्यवस्थापक मेबल चॅन पिल्लई, मुख्याध्यापक प्रकाश नायर यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये २७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस ’मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून उत्साहात साजरा केला जातो.

या दिवशी मराठी भाषेचे महत्त्व सांगण्यासाठी सुविचार लेखन, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, वेशभूषा, आणि निबंध स्पर्धा यांसारखे विविध सांस्कृतिक उपक्रम राबवले जातात, ज्यातून विद्यार्थ्यांना मराठी संस्कृती व भाषेची गोडी लावली जाते. मराठी भाषा गौरव दिन राज्यभर उत्साहात साजरा केला जातो. प्रत्येक मराठी माणसाला आपल्या मराठी संस्कृतीचा आणि साहित्याचा अभिमान वाटावा असा हा दिवस मराठी भाषा फक्त महाराष्ट्रापुरतीच नाही तर सर्व सीमा ओलांडून सातासमुद्रापारही गेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला आहे. तसेच मराठी जगातील दहाव्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे.

डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमीमध्ये सर्व जाती धर्म आणि विविध भाषेचे विदयार्थी शिक्षण घेत आहेत, परंतु या कार्यक्रमात भारताच्या अखंडपणाचे दर्शन घडवत विद्यार्थ्यांनी सादर केलेला अभंग भक्तिमय वातावरणात घेऊन गेला.

## फुंडे विद्यालयात मराठी राजभाषा आणि विज्ञान दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते बी.बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषेचे थोर कवी वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त मराठी दिन तसेच महान शास्त्रज्ञ सी.व्ही.रमण यांनी लावलेल्या शोधाच्या स्मरणार्थ २८ फेब्रूवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, उपमुख्याध्यापिका एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस.एस.पाटील व उपस्थित सेवक वृंदाच्या हस्ते वि.वा. शिरवाडकर व सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालायाचे ज्येष्ठ शिक्षक आर. जी.शेळके यांनी मराठी दिनाचे महत्व विशद केले. तसेच विद्यालायाच्या पर्यवेक्षिका एस.एस.पाटील यांनी विज्ञान दिन आपण का साजरा करतो याची सविस्तर माहिती दिली. विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यालयात पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. सूत्रसंचालन स्वरा सावंत व आभार उपशिक्षक एम.आर.पाटील यांनी मानले. नियोजन उपशिक्षिका व्ही.व्ही.गावंड व एस.व्ही.पाटील यांनी केले.

# नागरिकांच्या मागणीची महापौरांकडून दखल

## ◆ प्रभाग १४मधील समस्यांचा 'ऑन द स्पॉट' आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १४ मधील प्रलंबित नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी महापौर नितीन पाटील यांनी शनिवारी (दि. २८) सकाळी या प्रभागाचा विशेष पाहणी दौरा केला.



प्रभाग १४मधील साईनगर, एचओसी कॉलनी आणि परिसरातील विविध गृहनिर्माण संस्थांमधील नागरिकांनी आपल्या भागातील सफाई, कचरा व्यवस्थापन, रस्ते दुरुस्ती, सांडपाणी वाहिनी (सीवरेज लाईन) आणि पाणी समस्यांबाबत मयुरेश नेतकर यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले होते.

गेल्या महापालिका निवडणुकीत या प्रभागातून भाजपचे उमेदवार पराभूत झाले असले तरी आपल्या समस्या केवळ भाजप आणि महापौर सोडवू शकतात, असा ठाम विश्वास येथील नागरिकांनी व्यक्त केला. नागरिकांच्या या भावनांची दखल घेत मयुरेश नेतकर यांनी महापौरांकडे या दौऱ्याची मागणी केली होती. त्यानुसार शनिवारी सकाळी ८ वाजता या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले.

या पाहणी दौऱ्यादरम्यान साईनगर, एचओसी कॉलनी, गृहनिर्माण संस्था आणि नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी स्थानिक नागरिकांनी महापौरांचे औक्षण करून उत्साहात स्वागत केले. आमची कामे आपल्यामार्फतच होऊ शकतात, असा विश्वास व्यक्त करत नागरिकांनी मयुरेश नेतकर यांनाही अशाच प्रकारे जनहिताचे काम करत राहण्याच्या सूचना केल्या. या दौऱ्यात महापौरांसोबत पालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर, सुधीर साळुंखे आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारी आणि सूचना ऐकून घेतल्यानंतर महापौरांनी या सर्व समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे कडक निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

प्रभागातील उर्वरित भागातदेखील अशाच प्रकारचे नियोजन आगामी काळात केले जाणार असून त्याद्वारे प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्याचा भाजपचा मानस आहे. नागरिकांनी समस्यांसाठी मयुरेश नेतकर यांचे जनसंपर्क कार्यालय, शॉप क्र. २, श्री कृष्ण रुक्मिणी निवास, जुना ठाणा नाका, पनवेल येथे भेट द्यावी किंवा ९८२१५३१५४७ या क्रमांकावर संपर्क साधून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. याप्रसंगी मयुरेश नेतकर यांच्यासह सतीश पाटील, भाजपचे प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, माजी नगरसेविका सारीका भगत, तुषार कापरे, रोहित आटवणे, सचिन गमरे, केदार माने यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये रोजगार मेळाव्याला प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलतर्फे शुक्रवारी आजी व माजी विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावा घेण्यात आला.



मेळाव्यामध्ये नऊ नामवंत कंपनी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये येऊन विद्यार्थ्यांची निवड केली त्यामध्ये प्रामुख्याने टाइम्स प्रो, लाईव्ह टेक इंडिया व आय कॅन मेंटॉर्स अशा नामवंत कंपन्यांचा समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा होता. भव्य रोजगार मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून नवी मुंबई येथील इतर महाविद्यालयातील सात व रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील १५२ पात्र उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी केली, वेगवेगळ्या टेस्ट घेऊन व थेट मुलाखत घेतल्या.

वाणिज्य, विज्ञान तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेतला. महाविद्यालयाच्या सेंटर फॉर करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेलतर्फे विद्यार्थ्यांना पूर्वतयारीसाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजनही करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या दिशा मिळण्यास मदत झाली असून उद्योगक्षेत्र व शिक्षणक्षेत्र यांच्यातील दुवा अधिक बळकट झाला. नवी मुंबईमधील मुंबई विद्यापीठा सलग्नित महाविद्यालयातील तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व विद्यमान विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घेतला.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व प्रा. अर्पिता नायक, समन्वयक, सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वी घेण्यात आला. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या उपक्रमासाठी मेहनत घेतली.

# कामोठे विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमावेळी भारतीय चुंबकत्व संस्थान नवी मुंबई येथील वैज्ञानिक डॉ. प्रियेशु श्रीवास्तव, वरिष्ठ अनुवाद अधिकारी डॉ. गणेश काळघुगे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगरे, ज्येष्ठ शिक्षक गावंड, खुटले सर उपस्थित होते.



संस्कृती जानकर हिने मनोगतातून विज्ञानाचे महत्त्व मांडले. कृष्णा तुपे, श्रेयस घेरडे, ईशान शेख, सर्वेश अनुसे, धनश्री कुत्तरवाडे, वंतिका निषाद या विद्यार्थ्यांनी सेन्सर, रासायनिक अभिक्रिया, स्टेम लॅब साहित्याच्या आधारे छोटे छोटे वैज्ञानिक प्रयोग सादर केले. किमया खूस्पे या विद्यार्थिनीने विज्ञानावर आधारित प्रश्न विद्यार्थ्यांना विचारन त्यांच्या ज्ञानात भर टाकली. वैज्ञानिक डॉ. प्रियेशु श्रीवास्तव यांनी भारतीय चुंबकत्व संस्थान याविषयी माहिती सांगितली. तेथील शास्त्रज्ञ अंटार्टिका या ठिकाणीदेखील संशोधन करत आहेत हे सांगितले. विद्यार्थ्यांमधी कुतूहलता जागृत करून ती संशोधनासाठी कशी कार्य करते हे उदाहरणांमधून सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक कोंगेरे सर यांनी भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांचे योगदान आणि राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विज्ञान विभाग प्रमुख व्ही.व्ही. फडतरे, अनिल पाटील, एस. डी. पाटील, एस. ए. शिंदे, डी. डी. पाटील आणि आठवी ब चा वर्ग यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन स्वरांजली खरात, वेदांत जाधव या विद्यार्थ्यांनी केले.

# गव्हाण ग्रामपंचायत, कोपर गावात विविध कार्ड नोंदणीसाठी अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था संचालित चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त), नवीन पनवेल येथील लेखा व वित्त विभागामार्फत नागरिकांसाठी आयुष्मान भारत आरोग्य खाते कार्ड, नवीन मतदार व पॅन कार्ड नोंदणी या विषयावर समाजोपयोगी अभियानाचे आयोजन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी गव्हाण ग्रामपंचायत तसेच कोपर गाव येथे करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी पंचायत समिती सदस्या सौ. जिज्ञासा किशोर कोळी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत श्री. काशिनाथ कोळी (माजी सदस्य, ग्रामपंचायत गव्हाण) तसेच श्री.विशाल शंकर कोळी (सदस्य, सर्वोदय मच्छीमारी संस्था, गव्हाण) हे मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम लेखा व वित्त विभागाचे विभागप्रमुख डॉ. निलेश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. सदर विस्तार उपक्रमाचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक अनिकेत सोनसुरकर, आलोक भानुशाली, करण कोळी तसेच प्रिया लोंढे यांनी केले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये डिजिटल आरोग्य ओळख, लोकशाही प्रक्रियेत सहभाग तसेच आर्थिक समावेशनाबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता. कार्यक्रमादरम्यान अनेक नागरिकांनी आयुष्मान भारत आरोग्य खाते कार्ड, मतदार ओळखपत्र व पॅन कार्ड नोंदणीचा लाभ घेतला.

विद्यार्थी स्वयंसेवकांनी नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कोपर आणि गव्हाण गावातील नागरिकांनीही मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समाजकार्याचा अनुभव मिळाला, तर नागरिकांना एकाच ठिकाणी आवश्यक कागदपत्रांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध झाली. या अभियानादरम्यान एकत्रित रित्या एकूण २०२ नागरिकांची यशस्वी मतदार, आभा कार्ड व पॅन कार्डच्या माध्यमातून नोंदणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी स्वयंसेवक व सहाय्यक कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

या कार्यक्रमसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी.गडदे आणि प्राचार्य प्राध्यापक डॉ. एस. के.पाटील याचे मार्गदर्शन लाभले.



**पनवेल : येथील अवघ्या पावणेदोन वर्षांच्या मायरा नरेंद्र पाटील हिने अफाट ग्रहणशक्तीच्या जोरावर 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स',कलाम्स वर्ल्ड रेकॉर्ड्स, इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्ससह अनेक स्तरावरील पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे. या कामगिरीची दखल घेत नुकताच तिला पुणे येथे प्राईड ऑफ महाराष्ट्र २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी मायराचे अभिनंदन केले व तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह मायराचे आई-वडील उपस्थित होते.**

# 'सीकेटी'त राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात व वैज्ञानिक भावनेने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला माननीय मुख्याध्यापक संतोष चव्हाण सर, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, विज्ञान विभागप्रमुख स्वाती काळे तसेच विज्ञान विभागातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्याने केलेल्या सी.व्ही रमण यांच्या आत्मचरित्राच्या सुंदर सादरीकरणाने झाली. त्यांनी रमन परिणामाच्या शोधाबद्दल आणि भारतीय विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल माहिती दिली. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, ए. पी.जे. अब्दुल कलाम आणि आयझॅक न्यूटन यांसारख्या महान शास्त्रज्ञांविषयी माहितीपूर्ण भाषणे सादर केली. त्यांच्या कार्याने विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, चिकाटी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याची प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांनी विज्ञान व निसर्ग यांवर आधारित सुंदर कविता सादर केल्या. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध विज्ञान प्रकल्प आणि प्रयोगांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व व्यावहारिक ज्ञान प्रकर्षाने दिसून आले. कार्यक्रमादरम्यान तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शन, डॉ. होमी भाभा यंग सायंटिस्ट परीक्षा आणि ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

मुख्याध्यापकांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आणि यशासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम विज्ञान विभागाच्या प्रमुख स्वाती काळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

विज्ञान विभागातील शिक्षक स्वाती काळे (विभागप्रमुख, विज्ञान), प्राची ईसे, वैशाली लाऊत्रे, केशरी भोईर, कीर्ती पाटील, स्मिता भालेकर कार्यक्रम शेवटी आभार प्रदर्शनाने झाला आणि राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.




# चित्रपटाचे यश अन् सेलिब्रेशन

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

चित्रपट सुपर डुपर हिट होण्यातील सर्वात महत्त्वाचा घटक अर्थात प्रेक्षक. या प्रेक्षकांना चित्रपट आवडला रे आवडला की तो अक्षरशः डोक्यावर घेतात, आवडलेले काही चित्रपट कायमच डोक्यात ठेवतात आणि त्याच्या लोकप्रिय गाणी, टाळ्या शिट्ट्यांनी थियेटर डोक्यावर घेतलेले डायलॉग याच्या गोष्टी ते पुढील पिढीलाही रंगवून खूलवून सांगतात आणि असे सुपर डुपर हिट चित्रपट एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात राहतात... चित्रपटाच्या यशातील ही एक महत्त्वाची गोष्ट. यशस्वी चित्रपट कधीच थांबत नाहीत, पिढी बदलली तरी त्याचे अस्तित्व कायम असते.

प्रेक्षकांना चित्रपट आवडला नाही तर तो पडद्यावरच ठेवतात. छे छे पाहणार नाही असा जणू ते हट्ट धरतात. क्वचित कालांतराने कुठे एखाद्या चित्रपट शब्द कोड्यात त्या चित्रपटाचा काही संदर्भ वा तपशील आलाच तर स्मरणशक्तीला फार ताण देऊन तो चित्रपट आठवतो... सहज आठवू नयेत असे ते चित्रपट असतात.

एकूणच काय तर चित्रपटाच्या यशात चित्रपट रसिकांची भूमिका खूपच महत्त्वाची. म्हणूनच तर ज्या प्रेक्षकांच्या प्रेमावर चित्रपट यशस्वी ठरला त्याच प्रेक्षकांना सोबत घेऊन त्याच्या यशाचा सोहळा आयोजित केला तर त्याचे कौतुक करायला हवेच... चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत असे अधूनमधून घडत असते.

ताजे उदाहरण 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम'चे अर्धशतक प्लाझा चित्रपटगृहात प्रेक्षकांसह साजरे करण्यात आले त्याचे. हा सोहळा मोठ्या दणक्यात, जल्लोषात आणि उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर साकारलेल्या सादरीकरणाने वातावरण भारावून गेले होते. चित्रपटाचे यश... यश म्हणतात ते हेच असते. यावेळी घोड्यावरून बालशिवरायांचे आगमन होताच उपस्थितांमध्ये उत्साहाची प्रचंड लाट उसळली, तर शिवगर्जना ऐकताना प्रेक्षक स्तब्ध झाले, पुढच्याच क्षणी टाळ्यांचा कडकडाट झाला. घोषणांचा नाद, मराठी अस्मितेचा अभिमान आणि जल्लोषमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. चित्रपटाच्या टीमने छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना देत हा विशेष सोहळा विद्यार्थी आणि प्रेक्षकांसोबत साजरा केला.









दिग्दर्शक हेमंत ढोमे म्हणाले, मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी असलेला हा चित्रपट आणि शिवरायांचा प्रेरणादायी वारसा या दोन्हींचा संगम आज अनुभवायला मिळाला. प्रेक्षकांसोबत चित्रपट पाहाताना मिळालेलं समाधान वेगळंच आहे. ते शब्दांत मांडणं अशक्यच. प्रेक्षकांच्या प्रेमामुळेच हे शक्य आहे.

हेमंत ढोमे अगदी बरोबर बोलला. आपला चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी असून त्यातून कळत नकळतपणे प्रबोधन करणे असा त्याचा दृष्टिकोन असल्याचे नेहमीच जाणवते.

या चित्रपटात सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षीती जोग, कादंबरी कदम, हरीश दुधाडे, निर्मिती सावंत, पुष्कराज चिरपुटकर आणि प्राजक्ता कोळी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चलचित्र मंडळी निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हेमंत ढोमे यांनी केले असून निर्मितीची धुरा क्षीति जोग यांनी सांभाळली आहे.





प्रेक्षकांसोबत आपल्या चित्रपटाच्या यशाचे सेलिब्रेशन करण्याचे असे योग अधूनमधून येत असतात. अशाच काही आठवणी सांगायला हव्यात.

आपला एकामागोमाग एक मराठी चित्रपट सुपर डुपर हिट ठरतोय ही एक हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकण्यासाठी अतिशय उत्तम संधी आहे असे वाटत असतानाच दादा कोंडके यांनी 'तेरे मेरे बीच मे' (१९८४) आपल्या व्दैर्थी विनोदाच्या शैलीत पडद्यावर आणला (दादांनी आपल्याच 'तुमचं आमचं जमलं' या चित्रपटाची हिंदीत रिमेक केली होती. अनेक मराठी चित्रपटांचे दिग्दर्शक हिंदीत गेल्यावरही तिकडच्या संस्कृतीनुसार काम करत नाहीत असे पूर्वी अनेकदा घडे.). मुंबईत इंपिरियल चित्रपटगृहात 'तेरे मेरे बीच मे' रौप्य महोत्सवी यश संपादन करीत असतानाच हैदराबाद शहरातही या चित्रपटाने खणखणीत पंचवीस आठवड्याचे रौप्य महोत्सवी यश प्राप्त केले आणि दादांनी ठरवले आपल्या या पहिल्या हिंदी चित्रपटाच्या सुपर डुपर हिटचा सोहळा हैदराबाद येथील चित्रपटगृहात पब्लिकसोबत साजरा करायचा. दादांच्या चित्रपटाची वितरण व्यवस्था चोखपणे बजावत असलेल्या विजय कोंडके यांनी लगोलग नियोजन केले आणि मुंबईतील आम्हा काही निवडक सिनेपत्रकारानांही या सोहळ्यासाठी हैदराबादला नेले. मला आठवतंय, पिक्चर सुपर डुपर हिटने दादा कोंडके यांची तिकडे जबरदस्त क्रेझ निर्माण झाली होती. दादा कोंडके महाराष्ट्राबाहेरही लोकप्रिय होते. चित्रपटाचे यश बरेच काही घडवत असते. हाऊसफुल्ल गर्दीकडून दादा कोंडके आणि उषा चव्हाण यांना मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने आनंद झाला. तेलगू भाषिक राज्यात दादा कोंडके यांच्या यशाचा झेंडा फडकवला होता. हैदराबादमधील मराठी भाषिक चित्रपट रसिकही यावेळी भेटले.

आपला पहिला हिंदी चित्रपट रौप्य महोत्सवी यशस्वी ठरलेल्या अशा हैदराबाद शहरातील चित्रपटगृहातच सोहळा करण्याची ही कल्पना भन्नाट होती. काही वेगळे केले तर ते अधोरेखित होत असते.

निर्माता सुधाकर बोकाडे नेहमीच काही विशेष गोष्टी करण्यात रस असलेला सिनेमावाला. आणि मिडिया फ्रेंडली. त्यामुळे सुधाकर बोकाडे जे जे काही करणार त्याची बातमी होणार हे ठरलेले. बोकाडे निर्मित आणि लॉरेन्स डिसोझा दिग्दर्शित 'साजन' (१९९१) या चित्रपटाचा रौप्य महोत्सवी सोहळा चक्क दोनदा साजरा केला. त्यात एक होता या म्युझिकल सुपर डुपर हिट चित्रपटाने दक्षिण मध्य मुंबईतील ड्रीमलॅण्ड चित्रपटगृहात रौप्य महोत्सवी यश संपादन केले त्याच चित्रपटगृहात हा सोहळा आयोजित केला. या चित्रपटाचे संगीतकार नदीम श्रवण यांच्या शुभ हस्ते ड्रीमलॅण्ड चित्रपटगृहाचे वॉचमन, डोअर किपर, बुकिंग क्लार्क, ऑपरेटर वगैरे वगैरे सगळ्यांनाच 'साजन' रौप्य महोत्सवी स्मृती चिन्ह देण्यात आले. या चित्रपटाच्या यशात गीत संगीताचा अतिशय महत्त्वाचा सहभाग असल्याने संगीतकाराच्या हस्ते ही स्मृतीचिन्ह देण्यात आली हे अतिशय उत्तम झाले. आणि चित्रपटाच्या यशात चित्रपटगृहाचाही खूप महत्त्वाचा वाटा असतोच. नव्वदच्या दशकापर्यंत तर हिंदी चित्रपट प्रदर्शित करताना त्याचे दक्षिण मुंबईतील मुख्य चित्रपटगृह कोणते असावे वा असेल याला फार फार महत्त्व असे. चित्रपटाच्या जगात हीदेखील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट. 'साजन' चा आणखी एक रौप्य महोत्सवी यशाचा ग्लॅमरस सोहळा अंधेरीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये रंगला. माधुरी दीक्षित आपल्या आई वडिलांसोबत आली आणि ट्रॉफी स्वीकारताच निघालीदेखिल. तशी ती फिल्मी पार्टीत क्वचितच येणारी हा आम्हा चित्रपट पत्रकारांचा लाईव्ह अनुभव.

राजश्री प्रॉडक्शन निर्मित व सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन' (१९९४)च्या यशाचा झगमगाट आजही कायम आहे. आपल्या देशातील लग्न संस्कृतीत ग्लॅमर आणण्याचे श्रेय याच चित्रपटाकडे जाते. चित्रपट प्रदर्शित होताना 'ही तर लग्नाची व्हिडिओ कॅसेट' अशी त्याची थट्टा केली गेली. हा महाकौटुंबिक मनोरंजक चित्रपट सुरुवातीला संपूर्ण मुंबईत फक्त आणि फक्त लिबर्टी चित्रपटगृहात महागड्या तिकीट दराने प्रदर्शित झाला. नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्गाकडून या चित्रपटाचे जोरदार स्वागत करण्यात आले आणि काही आठवड्यांनी मुंबई उपनगरात हा चित्रपट प्रदर्शित झाला. तोपर्यंत या चित्रपटाच्या गीत, संगीत, नृत्याची लोकप्रियता वाढली होती. काही आठवड्यांनी बोरिवली येथील जया चित्रपटगृहात प्रेक्षकांसह या खणखणीत यशाचे दिलखुलास सेलिब्रेशन करायचे ठरले, येथपर्यंत ठीक हो, पण चक्क माधुरी दीक्षित या इव्हेंटला येणार आहे हे नुसतं जाहीर झाले आणि अनेकांची दिल की धक धक वाढत वाढत गेली. जया चित्रपटगृहाला चित्रपट रसिकांच्या पडलेल्या प्रचंड गर्दीने घातलेल्या वेढ्यातून माधुरी दीक्षितने कसा बसा मार्ग काढत काढत बाल्कनी गाठली. वृत्त वाहिन्या आणि मोबाईल येण्यापूर्वीचे ते छान दिवस होते. माधुरी दीक्षितला पाहता पाहता हृदयात जपून ठेवावे असे ते वातावरण होते. प्रत्यक्ष हाऊसफुल्ल गर्दीत जाऊन आपल्या चित्रपटाचे यश सेलिब्रिट करणे हा संवेदनशील कलाकारासाठीही एक सकारात्मक आनंद असतो.

सगळं काही प्रेक्षकांच्या प्रेमावर असतं. त्यांनी तुमचा चित्रपट लोकप्रिय केला आहे ना? तर मग चला, त्यांच्यासोबत यश सेलिब्रिट करुयात, त्यांच्यासाठी तो एक भन्नाट लाईव्ह अनुभव असतो, कायमच आठवणीत ठेवण्यासाठी...

---

# धर्मस्वातंत्र्यासाठी बलिदान देणारे महान गुरू तेग बहादुर साहेबजी

भारताच्या इतिहासात अनेक संत, महात्मे आणि क्रांतिकारकांनी आपल्या विचारांनी व कार्यांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यापैकी शीख धर्माचे नववे गुरू तेग बहादुर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. त्यांचे जीवनकार्य हे केवळ शीख समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

गुरू तेग बहादूर यांच्या शहिदीच्या ३५०व्या वर्षपूर्तीनिमित्त नागपूर, नांदेड आणि मुंबई येथे भव्य स्मरण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा मुख्य उद्देश गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाची आठवण जागवणे, त्यांच्या विचारांचा प्रसार करणे तसेच समाजात एकता, बंधुता आणि आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करणे हा आहे. या अंतर्गत २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे प्रमुख राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम विविध धर्म, संप्रदाय व समाजघटकांना एकत्र आणणारा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार आहे.



**जन्म आणि बालपण**

गुरू तेग बहादुर यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. त्यांचे वडील गुरू हरगोबिंद हे शीख धर्माचे सहावे गुरू होते. बालपणी त्यांचे नाव त्यागमल असे होते. लहान वयातच त्यांनी शौर्य, संयम आणि आध्यात्मिकतेची चिन्हे दाखवली. वडिलांकडून त्यांनी शस्त्रविद्या आणि धर्मज्ञान यांचे शिक्षण घेतले. एकदा मुघल सैन्याविरुद्ध झालेल्या युद्धात त्यांनी पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्यामुळे त्यांना तेग बहादुर (तेग म्हणजे तलवार, बहादुर म्हणजे शूर) हे नाव देण्यात आले. पुढे ते याच नावाने ओळखले जाऊ लागले.

**आध्यात्मिक साधना आणि समाजकार्य**

गुरू तेग बहादुर यांनी आयुष्यातील अनेक वर्षे ध्यान, साधना आणि समाजसेवेसाठी अर्पण केली. त्यांनी पंजाब, बिहार, आसाम आणि बंगाल अशा विविध प्रदेशांत प्रवास करून लोकांना सत्य, प्रेम आणि सहिष्णुतेचा संदेश दिला. त्यांनी अंधश्रद्धा, अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या शिकवणीत नम्रता, संयम, परोपकार आणि ईश्वरभक्ती यांना विशेष महत्त्व होते. त्यांनी लोकांना सांगितले की खरा धर्म हा मानवतेची सेवा करण्यात आहे. त्यांचे अनेक विचार गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांच्या रचनांमध्ये वैराग्य, निडरता आणि आत्मबल यांचे सुंदर वर्णन आढळते.

आनंदपूर साहिबची स्थापना

गुरू तेग बहादुर यांनी पंजाबमध्ये आनंदपूर साहिब या शहराची स्थापना केली. हे ठिकाण पुढे शीख धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. येथे त्यांनी धर्मप्रसार आणि समाजरचना यांचे कार्य केले. आनंदपूर साहिब आजही शीख समुदायासाठी अत्यंत पवित्र स्थान मानले जाते.

**मुघल काळ आणि धार्मिक अत्याचार**

त्या काळात भारतावर मुघलाचे याचे राज्य होते. त्यांच्या कारकीर्दीत धार्मिक असहिष्णुता वाढली होती. जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणण्याचे प्रकार सुरू होते. विशेषतः काश्मीरमधील हिंदूंवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत होते. काश्मिरी पंडितांनी या अन्यायाविरुद्ध मदतीसाठी गुरू तेग बहादुर यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी त्यांना संरक्षण देण्याचे आश्वासन दिले. गुरुजींनी स्पष्ट सांगितले की जर त्यांना इस्लाम स्वीकारायला भाग पाडले जात असेल, तर आधी मला धर्मांतर करावे लागेल. त्यांच्या या ठाम भूमिकेमुळे ते मुघलांच्या रोषाला सामोरे गेले.

**बलिदान**

गुरू तेग बहादुर यांना अटक करून दिल्ली येथे आणण्यात आले. त्यांच्यावर इस्लाम स्वीकारण्याचा दबाव टाकण्यात आला; परंतु त्यांनी धर्मांतरास नकार दिला. शेवटी ११ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांची हत्या करण्यात आली. त्यांचे बलिदान मानवतेच्या इतिहासातील एक महान घटना मानली जाते. त्यांनी स्वतः च्या धर्मासाठी नव्हे, तर इतरांच्या धर्मस्वातंत्र्यासाठी प्राण दिले. त्यामुळे त्यांना हिंद की चादर ही उपाधी मिळाली.

ज्या ठिकाणी त्यांचे शिर छाटण्यात आले, त्या ठिकाणी आज गुरुद्वारा शीश गंज साहिब उभा आहे. हे स्थान त्यांच्या बलिदानाची साक्ष देत आजही लाखो भाविकांना प्रेरणा देते.

**गुरू गोविंदसिंहांवर प्रभाव**

गुरू तेग बहादुर यांचे सुपुत्र गुरू गोविंदसिंह पुढे शीख धर्माचे दहावे गुरू झाले. वडिलांच्या बलिदानाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. पुढे त्यांनी खालसा पंथाची स्थापना करून शीख धर्म अधिक संघटित व बळकट केला. गुरू तेग बहादुर यांच्या शिकवणीमुळेच शीख समाजात निडरता आणि त्यागभाव दृढ झाला.

**शिकवण आणि विचार**

गुरू तेग बहादुर यांच्या शिकवणीचा मुख्य गाभा म्हणजे सत्याचा मार्ग कधीही सोडू नका. अन्यायाविरुद्ध ठाम उभे रहा. सर्व धर्मांचा आदर करा. ईश्वरभक्ती आणि मानवसेवा यांचा संगम साधा. त्यांच्या रचनांमध्ये जीवनाचे क्षणभंगुर स्वरूप आणि आत्मिक शांतीचा संदेश आहे. त्यांनी माणसाला भयमुक्त आणि आत्मनिर्भर बनण्याचा उपदेश केला.

गुरू तेग बहादुर यांचे जीवन हे त्याग, शौर्य आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी स्वतःचा बळी दिला, परंतु आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड केली नाही. त्यांचे कार्य आणि बलिदान भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

आजच्या काळातही गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या विचारांची गरज अधिक आहे. धार्मिक सहिष्णुता, परस्पर आदर आणि मानवतेची भावना जपणे हीच त्यांच्याप्रति खरी श्रद्धांजली ठरेल. श्री गुरू तेग बहादुर यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्य आणि न्यायासाठी लढताना कितीही संकटे आली तरी धैर्य सोडू नये.

त्यांचे बलिदान हे केवळ एका धर्माचे नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. म्हणूनच ते भारतीय इतिहासातील एक अजरामर आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून सदैव स्मरणात राहतील.

गुरू तेग बहादुर साहेबजी यांचा त्याग, त्यांची अध्यात्मिक साधना आणि समाज कार्य, बलिदान, शिकवण आणि विचार समाजात रुजावेत यासाठी त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे आयोजन प्रथम नागपूरला नंतर नांदेड येथे झाले. आता २८ फेब्रुवारी व १ मार्च असा नवी मुंबई येथील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर येथे होत आहे. या समागमामध्ये महनीय व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. आपणही या शहीदी समागमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**-रणजित पवार,** सोलापूर

---

# भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला

भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर डॉ. कल्पना चावला यांचा आज (१ फेब्रुवारी) स्मृतिदिन. २३ वर्षांपूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्यासोबत सहा अंतराळवीरांचा चमू होता. त्यांचादेखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना चावला जन्माने भारतीय असलेल्या प्रथम महिला आणि राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात गेलेल्या दुसऱ्या भारतीय व्यक्ती होत्या.



कल्पना चावला यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरियाणातील करनाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसी लाल, तर आईचे नाव संयोगिता. त्यांच्या आईला आपल्याला मुलगा व्हावा अशी इच्छा होती, पण त्यांना कुठे ठावूक होते की आपली मुलगी संपूर्ण जगात नाव कमावेल. चावला यांचे शिक्षण टागोर विद्यालय येथून झाले. १९८२ साली त्या अमेरिकेत गेल्या. १९८४ साली त्यांनी टेक्सास विद्यापीठातून एरोस्पेस इंजीनिरिंगची मास्टर ऑफ सायन्स ही पदवी मिळविली. त्यांना अंतराळवीर होण्याच्या स्वप्नाने असे पछाडले होते की त्या वेळेस झालेल्या चॅलेंजर यान अपघाताची चर्चादेखील त्यांना त्यांच्या ध्येयापासून विचलित करू शकली नाही. त्यांनी १९८६मध्ये दुसरी मास्टर पदवी आणि १९८८मध्ये कोलेराडोतून एरोस्पेसमध्ये डॉक्टरेट मिलविली. १९८८मध्ये त्यांनी 'नासा'तील एम्स रिसर्च सेंटर ओवरसेट मेथड्सच्या उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९९१मध्ये त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाल्यानंतर त्यांनी 'नासा'मध्ये ॲस्ट्रॉनॉट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना मार्च १९९५ साली तेथे प्रवेश मिळाला. त्यांनंतर त्यांची १९९६मध्ये पहिल्या उड्डानासाठी निवड झाली. त्यांची पाहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी सुरू झाली. त्या सहा अंतराळवीरांच्या चमूचा एक भाग होत्या व हा चमू कोलंबिया स्पेस शटल एसटीएस ८७चे चालन करत होता. त्यांच्या पहिल्या मोहिमेत त्या ३७२ तास अंतराळात होत्या.

या मोहिमेनंतर त्यांना अंतराळ स्थानकावर काम करायचे होते. चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डानासाठी एसटीएस १०७च्या चमूसाठीदेखील निवडण्यात आले होते, परंतु ही मोहीम वारंवार आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे लांबली जात होती. १६ जानेवारी २००३ रोजी चावला दुर्दैवी एसटीएस १०७ मोहिमेवर जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. त्यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला जवळजवळ ८० प्रयोग करावयाचे असून त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती, अंतराळविरांचे आरोग्य आणि सुरक्षितता या विषयांचा समावेश होता.

चावला यांचा मृत्यू १ फेब्रुवारी २००३ रोजी अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात पुनर्प्रवेश आणि करताना जमिनीवर उतरताना अपघातात झाला. त्यांच्यासोबत असलेल्या सर्व चमूचा त्यात दुर्दैवी अंत झाला. चावला यांना मरणोत्तर सन्मान पदक, नासा स्पेस फ्लाइटचे पदक तसेच नासा विशेष सेवा पदक बहाल करण्यात आले. त्यांच्या नावाने आयएसयू शिष्यवृत्ती फंड हा इंटरनॅशनल स्पेस युनिव्हर्सिटी (आयएसयू)द्वारा आंतरराष्ट्रीय अंतराळ शिक्षण कार्यक्रमामध्ये भाग घेतलेल्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी २०१० साली सुरू करण्यात आला आहे. द कल्पना चावला मेमोरियल स्कोलरशिप प्रोग्राम भारतीय विद्यार्थी संघटना, टेक्सास विद्यापीठ, अल पासो यांनी २००५पासून गुणवंत पदवीधर विद्यार्थ्यांसाठी सुरू केला आहे. द कल्पना चावला आउटस्टैंडिंग रीसेंट अलुम्नी अवार्ड हा कोलाराडो विद्यापीठाने जो १९८३पासून दिला जातो त्याचे नामकरण डॉ. चावला यांच्या नावाने केले.

करनालमध्ये कल्पना चावला यांच्या जन्मगावी ३० हजार शालेय मुले आणि नागरिक यांनी हातात हात धरून ३६.४ किमी लांब मानवी साखळी केली होती. ही साखळी चावला यांच्या नावाने शाहरामध्ये सरकारी मेडिकल कॉलेज व्हावे याच्या समर्थनासाठी होती. 'कल्पना चावला मेडिकल कॉलेज निर्माण कमिटी' यात वेगवेगळ्या संस्थांचे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते तसेच ३४ शाळांमधील विद्यार्थी यांचा समावेश होता.१८ नोव्हेंबर २०१३ रोजी राज्य सरकारने पायाभरणी करतानाचा दगड त्यांच्या स्मृतिनिमित्त रोवण्यात आला. त्यांच्या स्मरणार्थ ५१८२६ या अश्नीला त्यांचे नाव देण्यात आले. ५ फेब्रुवारी २००३मध्ये भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना-१ हे नाव दिले. त्यानंतर सोडलेल्या उपग्रहाला कल्पना-२ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरूक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरु केले. 'नासा'ने त्यांनी बनविलेल्या सुपर कंप्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले.

अंतराळवीर कल्पना चावला यांच्यापासून प्रेरणा घेऊन २०१३मध्ये आपल्या नाशिकमध्येही काही खगोलप्रेमी तरुणांनी एकत्र येऊन कल्पना युथ फाउंडेशन या नावाची संस्था सुरू केली. चावला या आपल्याला त्यांचे धैर्य, जिद्द, चिकाटी, त्यांनी केलेले बलिदान आणि देशाला मिळवून दिलेला अभिमान यासाठी नेहमीच आठवणीत राहतील. (साभार : माझे पान)

# रेवदंड्यातील सुरूच्या बनात मद्यपींना उधाण

## अनधिकृत टपऱ्या हटविण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा हरेश्वर मार्गातील समुद्र किनारी स्थनिक, पर्यटक, पै-पाहूणे यांना विरगुंळा म्हणून उभारलेल्या सुरू व माड बनात मात्र रात्रीस खेळ सुरू असून तेथे रात्रीस मद्यपीचे अड्डे बनले आहेत. तेथेच रात्री उशीरापर्यंत व्यवसाय करत असलेल्या अनधिकृत टपऱ्या त्वरीत हटविण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करत आहेत.

रेवदंडा हरेश्वर मार्गातील समुद्र किनारी सुरू व माड बनात रात्री उशीरापर्यंत दारू व बियर यांचे घश्यात रिचवीत वेगळाच तमाशा सुरू असतो. रेवदंडा सुरू, माड बन मद्यपीचा अड्डा बनला असून रात्रीस उशीरापर्यंत धुडगूस घातला जातो, सकाळी सुरू, माड बनात दारू व बियर बाटल्याचा खच पडलेल्या दिसून येतो. येथील सुरू, माड बनात बसण्यासाठी असलेले बेंचेसवर सुध्दा दारू व बियरच्या बाटल्यासह विविध चकण्याची घाण येथे टाकलेली असते. रात्रीच्या दुरावस्थेने येथे येणाऱ्या स्थानिक, पर्यटक, व पै-पाहूणे यांच्या सुविधेसाठी बनविण्यात आलेल्या सुरू व माड बनात गलिच्छपणा जाणवतो. त्यामुळे विरगुंळा म्हणून बसण्यासाठी आलेल्याचा हिरमोड होतो. याबाबत अनेकदा रेवदंडा पोलिस ठाणेचे निदर्शनास येतील स्थानिक ग्रामस्थांनी आणून दिले आहे. मात्र पोलिस सुध्दा येथे रात्रीचे वेळेस फेरफटका मारत नसल्याने मद्पीचे फारच फावले आहे.



या परिसरात बाहेरील लोकांनी टपरी व्यवसाय सुरू केला आहे, या टपरीवर सिगरेट, तंबाखू, गुटखा तसेच थंडपेय आदी प्रकार रात्री उशीरापर्यंत विक्रीस ठेवतात. रात्रीचे सुमारास फार उशीरापर्यंत या टपऱ्या उघडया असल्याने जिकडून तिकडून चारी बाजूने येथे रात्री मद्यपी व स्मोकिंगवर्ग येत असतो, त्यामुळे रात्री उशीरापर्यंत येथे गर्दी असते.

या अनाधिकृत टपर्यावर बाहेरील व्यक्ती व्यवसाय करत आहेत, तसेच या अनाधिकृत टपऱ्यांसाठी पक्के बांधकाम पाया लगत केल्याचे दिसते. या टपर्या बाबत स्थानिक संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. येथे दिवसा व रात्री जाणे-येणे स्थानिकांसाठी विशेषतः महिलावर्गासाठी भितीयुक्त बनले आहे. या बाहेरील टपऱ्या व्यावसायीकांना स्थानिकांचा असलेला विरोध लक्षात न घेता महावितरण विदयुत पुरवठा करून येथील स्थानिकांवर अन्याय केला आहे. याबाबत रेवदंडा ग्रामपंचायतीची संपर्क केला असता, या अनाधिकृत टपर्या उभारण्यासाठी अथवा बांधण्यासाठी कोणतीही परवानगी दिली गेली नसल्याचे सांगितले. येथे फक्त फिरत्या हातगाडी वाल्याना व्यवसायास परवानगी दिली आहे, मात्र अनाधिकृतपणे पक्के पायाचे बांधकाम करून या टपऱ्या कोणत्याही परवानगी शिवाय उभारल्या व बांधल्या आहेत, असे सांगण्यात आले, मात्र या अनाधिकृत टपऱ्याची माहिती रेवदंडा ग्रामपंचायतीस असताना, या टपर्यांना कोणाचे आशिर्वादाने व अभयाने परवानगी नसताना सुरू आहेत असा संप्तत प्रश्न स्थानिक ग्रामस्थ विचारीत आहेत. या अनाधिकृत टपऱ्या त्वरीत हटविण्यात याव्यात अशी मागणी येथील स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. जेणेकरून रात्रीस सुरू व माड बनात होत सुरू असलेले मद्यपीचे अड्डे बंद होतील.

# श्रीवर्धनमधील एलईडी मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पोलिसांकडून रात्री समुद्रात गस्ती करीत असताना नानवेल दीप गृहापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावर श्रीवर्धन येथील दोन बोटी संशयित्रीत रित्या मासेमारी करताना आढळून आल्या या बोटीमधील सर्वांची कसून तपासणी केली असता सदरची बोट एलईडीद्वारे मासेमारी करताना आढळून आल्याने तसे साहित्य बोटीत आढळून आल्याने दोन्ही बोटी व साहित्य मुरूड पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आली असून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांनी ही धडक कार्यवाही केल्याने अवैध मासेमारिस आळा बसणार आहे.



श्रीवर्धन येथील धनलक्ष्मी बोट (एमएच ०३ एमएम ४०९४) या बोटीमधील एलईडी लाईट १० नग, पाण्याखाली वापरण्यात येणारे एलईडी बल्ब दोन नग एक जनरेटर जप्त करण्यात आला आहे. वैष्णवी बोट क्रमांक एम एम ४१९७ बोटीमधील एलईडी लाईट आठ नग, पाण्याखाली सोडण्यात येणारे बल्ब दोन नग, एक जनरेटर ताब्यात घेण्यात आले आहेत.

या दोन बोटीमधील श्रीवर्धन भरडखोल येथील मन्सूर हमीद सोलकर, वैष्णव वाघे, प्रमोद चौलकर, चंद्रकांत पाटील आदींवर रीतसर कार्यवाही मासेमारी अधिन्यमध्वारे करण्यात आली आहे.

ही यशस्वी कार्यवाही पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. रसेडे, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ दळवी, सहायक पोलीस उपनिरीक्षक नौका विभाग आगरदांडा तळ किरप्पा गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नागेश भवर, पोलीस शिपाई अभय परंदवाल आदी ही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

# 'त्या' मृत महिलेचे रेखाचित्र जारी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर ते महाबळेश्वर रस्त्यावरील आंबेनळी घाटात बुधवारी जळालेल्या अवस्थेत सापडलेल्या महिलेच्या मृतदेहानंतर तपास यंत्रणेची चक्रे वेगाने फिरवली जात असून गुन्हे अन्वेषण विभागाकडून मृतदेहाच्या शारिरीक ठेवणीवरुन महिलेचे रेखाचित्र तयार करून प्रसारित करण्यात आले आहे.



बुधवारी सकाळी आंबेनळी घाटाच्या रुंदीकरणाच्या कामातील एका सिमेंट काँक्रीटच्या भिंतीतील मोरीच्या पाईपामध्ये एका महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आला. मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी प्रयत्नांची शर्थ चालवली असून गुन्हे अन्वेषण विभागाचे सहकार्य याकामी घेतले आहे.

महिलेच्या डाव्या हाताच्या करंगळी लगतच्या बोटात लाल रंगाच्या खड्याला कोंदण असलेली अंगठी आहे तर दोन्ही पायांच्या अंगठ्याजवळील बोटात जोडव्या आहेत. मृत महिलेच्या रेखाचित्रावरुन वर्णनाप्रमाणे वय, पत्ता व अन्य सविस्तर माहिती असल्यास कळविसाठी सपोनि आनंद रावडे (९०११७६१५७३), उपनिरीक्षक मंगेश मुंडे (७७६७०८९४०८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# महाआवास अभियानांतर्गत रायगड जि.प.ची उत्कृष्ट कामगिरी

**अलिबाग : वार्ताहर**

महाआवास अभियांतर्गत उत्कृष्ट काम करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेला कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते बुधवारी (दि.२५) गौरविण्यात आले. नवी मुंबई येथील सिडको भवन येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गुणवत्ता वाढीसाठी राज्यात सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या कालावधीत महाआवास अभियान राबविण्यात आले.

## विभागस्तरावर विविध पुरस्कारांनी गौरव



या अभियानात राज्य पुरस्कृत आवास योजना २०२१-२२ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, प्रधानमंत्री आवास योजना २०२२-२३ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, प्रधानमंत्री आवास योजना २०२३-२४ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, राज्य पुरस्कृत आवास योजना २०२३-२४ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात द्वितीय क्रमांक यासोबतच राज्य पुरस्कृत आवास योजना २०२२-२३ सर्वोत्कृष्ट पंचायत समिती विभागात पनवेल पंचायत समितीला प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. हा पुरस्कार मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी स्वीकारला.

# चिंतामणराव केळकर विद्यालयात विज्ञान दिन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा हा या मागचा मुळ उद्देश होता.



विज्ञान दिवसाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी ते नववीतील विद्यार्थी यात सहभागी झाले होते. विज्ञानावर आधारीत विवीध प्रयोग आणि उपकरणे त्यांनी यावेळी सादर केली. यात प्रामुख्याने चालण्याने विद्युत निर्मिती प्रयोग, सौर्य उर्जेवर आधारीत उपकरणे, चुंबकीय शक्तीचा वापर करून चालणारी रेल्वे, हायड्रॉलिक प्रक्रीयेतून उडणारे रॉकेट, स्वयंचलित नळ, औद्योगिक प्रकल्पातून निघणाऱ्या प्रदूषित वायूचे शुद्धीकरण करणारा प्रकल्प आदी वैज्ञानिक प्रयोगांचा समावेष होता.

मुलांमध्ये विज्ञानाबद्दल रुची तयार व्हावी आणि त्यांच्यातील प्रयोगशिलतेला चालना मिळावी या उद्देशाने हा उपक्रम साजरा शाळा व्यवस्थापनाने राबविला. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. विज्ञान प्रदर्शनासाठी शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी वर्गाने खुप महेनत घेतली. त्याचबरोबर मराठी भाषा दिनाचे मराठी भाषेतील ग्रंथसंपदा तसेच साहित्य प्रदर्शनाच्या स्वरुपात ठेवण्यात आले होते. मराठी नाटकांच्या विविध प्रकारांचे माहितीपर प्रदर्शन मांडण्यात आले होते.

# नवघर शाळेत 'कवी आपल्या भेटीला'

**पाली : प्रतिनिधी**

राजभाषा मराठी दिन आणि वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. या औचित्याने नवघर शाळेत 'कवी आपल्या भेटीला' हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी सुधागड तालुक्यातील कासारवाडी गावचे नवोदित आणि सुप्रसिद्ध कवी उमेश जाधव यांनी आपल्या काव्य सादरीकरणाने विद्यार्थ्यांची मने जिंकली.

मुख्याध्यापिका संगीता बैकर यांनी कवी उमेश जाधव यांचे पुष्पगुच्छ देऊन सहर्ष स्वागत केले. कवीचा परिचय उपशिक्षिका शितल पाटील यांनी करून दिला.



सुधागडच्या मातीतील एक उदयोन्मुख आणि शब्दप्रभू कवी म्हणून त्यांनी उमेश जाधव यांचा गौरव केला.

कवी उमेश जाधव यांनी आपल्या दमदार आणि भारदस्त आवाजात मराठी दिनाचे महत्त्व विशद केले. त्यांनी स्वतः लिहिलेल्या 'पाऊस' आणि 'आई' या विषयांवरील कवितांचे सादरीकरण केले, ज्याने विद्यार्थी आणि शिक्षक भावूक झाले. केवळ कविताच नव्हे, तर मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या 'लोकगीतांचे' महत्त्व सांगत त्यांनी काही लोकगीतेही सादर केली.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन शाळेतील शिक्षकांनी अत्यंत नेटकेपणाने केले होते. यामध्ये वृषाली गुरव विषयशिक्षिका, शितल पाटील (उपशिक्षक), अनुजा माने (उपशिक्षिका), रुपाली लेंडवे (उपशिक्षिका) यांचा मोलाचा वाटा होता.

# दुर्गम, आदिवासी भागात दंतचिकित्सा आणि उपचार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील बोरगाव या ठिकाणी त्या परिसरातील विद्यार्थी यांची मोफत दंत चिकित्सा आणि उपचार आयकेएस फाऊंडेशन नवी मुंबई ऐरोली यांच्या वतीने करण्यात आले होते. त्याचा लाभ परिसरातील विद्यार्थी यांनी घेतला.

खालापूर तालुक्यातील बोरगाव हे माथेरान पायथ्याशी असून या दुर्गम आदिवासी भागातील शाळांमधील विद्यार्थी यांची दंत चिकित्सा व त्यावर उपचार करण्याचे महत्वपूर्ण दंत चिकित्सा शिबिर आयकेएस फाऊंडेशन नवी मुंबई ऐरोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. परिसरातील सर्व शाळेचे विद्यार्थी यांनी दंत चिकित्सा करून घेतली.

डॉ.अपूर्वा बांगर, डॉ.स्वाती मौर्या, डॉ. कीर्ती, डॉ.मोनिका भोईर, डॉ.अंशूला, डॉ. विशाल वाघमारे यांनी चिकित्सा केली.त्यांना मदतनीस म्हणून तांत्रिक शोएब यांनी सहकार्य केले. या परिसरातील शिक्षक संजय चव्हाण, अमित मिडगुले, मधू पारधी, चंद्रशेखर शिंदे, अशोक सानप, सुधीर राठोड, बाळू भालसिंग, स्नेहल लंके, संजय नागरे, अशोक, राठोड, राजाभाऊ चव्हाण, सुरेश पवार, चांगु पिरकड यांनी विद्यार्थी यांना शिबिर ठिकाणी ने व आण करण्याची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली.

# माणगावजवळ रस्त्याच्या कडेला बसलेल्या प्रवाशांना कारची धडक

## १६ जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर बायपासजवळील कशेणे गाव परिसरात पहाटेच्या शांत वेळेत घडलेल्या भीषण अपघाताने परिसर हादरून गेला. रस्त्याच्या कडेला बसलेल्या सुमारे २० प्रवाशांना भरधाव कारने चिरडल्याने १६ जण जखमी झाले असून त्यापैकी चार जणांची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमींना तातडीने मुंबई येथे हलविण्यात आले आहे. ही दुर्घटना शुक्रवारी २७ पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

कोकणातून मुंबईकडे निघालेल्या एका लक्झरी बसचा टायर पंक्चर झाल्याने चालकाने वाहन महामार्गाच्या कडेला उभे केले. बसमधील सुमारे ४० प्रवासी खाली उतरले होते. काही प्रवासी रस्त्याच्या कडेला बसले होते, तर काहीजण बाजूला उभे राहून टायर बदलण्याची प्रतीक्षा करत होते. याचवेळी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या भरधाव कारने अचानक नियंत्रण गमावून रस्त्याच्या कडेला बसलेल्या प्रवाशांवर जोरदार धडक दिली. बेसावध असलेल्या प्रवाशांना काही समजण्याआधीच कार अंगावर आल्याने आरडाओरडा आणि गोंधळ उडाला. पहाटेच्या अंधारात घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. अपघातात काही प्रवाशांच्या हात, पाय, खांदा, मांडी, कंबर आणि बरगड्यांना गंभीर दुखापती झाल्या आहेत.


**CHANGE OF NAME**

I have changed my name from **DOLARE ABDUL RAHMAN to ABDUL RAHMAN UBAID AHMED DOLARE** as per documents, the Name mantion on Passport is **DOLARE ABDUL RAHMAN Which change as ABDUL RAHMAN UBAID AHMED DOLARE.**


# केएमसी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन

**खोपोली : प्रतिनिधी**

मराठी भाषेच्या दैनंदिन वापराबरोबरच प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात भाषेच्याद्वारे उत्तम करिअर करण्याची संधी युवा पिढीला आहे. त्यासाठी मराठी भाषा आत्मसात करून भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांनी विकसित करावीत, असे मार्गदर्शन ज्येष्ठ पत्रकार जयंत धुळप यांनी केले.

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के.एम.सी. महाविद्यालयात मराठी भाषा व साहित्य मंडळाने आयोजित केलेल्या मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील, महाविद्यालय विकास समितीचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे संचालक भास्कर लांडगे, प्रभारी प्राचार्य डॉ. विकास सूर्यवंशी, सेवानिवृत्त शिक्षक पद्माकर गायकवाड, पत्रकार दिलीप पवार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

मराठी विभाग प्रमुख डॉ.भाऊसाहेब नन्नवरे यांनी या उपक्रमामागील भूमिका प्रास्ताविकातून मांडली.

कार्यक्रमाच्या आयोजनात सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. गणपती मुळीक, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ.अमोल नागरगोजे, प्रा.प्रिया निरलेकर, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. डॉ.प्रतिभा टेंबे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कौस्तुभ निकाळजे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा.विठ्ठल जाधव यांनी आभार मानले.

# ...तर विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी होईल -डॉ. वैशाली पाटील

**पेण : प्रतिनिधी**

मराठी बोली ही फक्त बोलण्याची पद्धत नाही, ती विचारांची, भावना व्यक्त करण्याची आणि सामाजिक बंध मजबूत करण्याची क्षमता आहे, आपल्या मातृभाषेत व्यक्त होण्याची सहजता वाढविल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले.

मराठी भाषा दिनानिमित्त आशाकिरण इंग्लिश माध्यम स्कूल, पानेड येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मिस. रेखा गायगोले, प्रिन्सिपॉल रोसमेरी, मिस अन्सिना आदी उपस्थित होते.

यावेळी आशाकिरण शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध कला सादरीकरणांतून मराठी भाषेचा महिमा उलगडून दाखवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश पारखे यांनी केले, तर रेखा गायगोले यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.




Rayat Shikshan Sanstha's

**Loknete Ramsheth Thakur Public School, Kamothe**

**Sector-6A, Plot No.40, Kamothe. Tal- Panvel. Pin No. 410209**
**Ph. No. 8779198516 Email Id:- lrtpskamothe@gmail.com**

**Tender Notice**

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Repairing and Internal Painting work of building (Gr.+6 fl).

The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site **https://edumart.sets.co.in** from 02-03-2026 and Tender must be submitted online to this website up to 12-03-2026 @ 5.00 pm.

Details are as follows –

| Work | Work Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable |
|---|---|---|---|---|
| School building ( Ground +6 fl) | 9980 sqm (107425 sft ) | 1,12,00,000/- | 1,12,000/- Rs. | Rs. 5000/- |

**Principal**
Loknete Ramsheth Thakur Public School, Kamothe

# सर्दी, खोकला, तापाच्या रुग्णांमध्ये वाढ

## उरणमध्ये बदलत्या वातावरणाने आरोग्यावर परिणाम

**उरण : वार्ताहर**

बदलत्या हवामानामुळे उरण तालुक्यातील सर्दी, खोकला, तापाच्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ होत चालली आहे. गेल्या चार महिन्यात उरण परिसरातील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र या दोन्ही रुग्णालयात सर्दी, खोकला, तापाच्या एकूण ११ हजार ३७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत, अशी माहिती शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

उरण तालुक्यातील एकूण लोकसंख्या पावणेदोन लाखांच्या घरात आहे. परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि रोजगाराच्या निमित्ताने येणाऱ्या कामगारांमुळे या लोकसंख्येत वाढ होत चालली आहे. वाढती रहदारीमुळे अपघाताची संख्याही वाढत चालली आहे, मात्र वाढती लोकसंख्या आणि वाढत्या अपघातांमुळे ३० खाटांचे एकमेव असलेल्या शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाढत्या रुग्णांसाठी अपुरे पडत आहे. त्यामुळे उरणकरांची मागील १५ वर्षांपासून अद्यावत १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी केली जात



आहे, मात्र जागा जमिन उपलब्ध असतानाही उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची प्रक्रिया अद्यापही सुरू झालेली नाही. तर उपचारासाठी बाहेरच्या शहरात जावे लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे.

उरणमधील सातत्याने बदलत असलेल्या हवामान व वातावरणामुळे नागरीकांना सर्दी, खोकला, तापाच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत चालली आहे. उरण येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नोव्हेंबर, डिसेंबर २०२५ व जानेवारी, फेब्रुवारी २०२६ या चार महिन्यांतच सर्दी, खोकला, तापाच्या नऊ हजार १२० रुग्णांवर उपचार करण्यात आले असल्याची माहिती उरणच्या ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक बाळासो कालेल यांनी दिली. दररोज २५० बाह्यरुग्ण रुग्णालयात उपचारासाठी येतात. यापैकी दररोज सर्दी, खोकला, तापाचे सरासरी ८० रुग्ण आढळून येत आहेत.

कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ८०-९० बाह्यरुग्ण रुग्णालयात उपचारासाठी येतात. यापैकी दररोज १० रुग्ण सर्दी, खोकला, तापाचे आढळून येतात. मागील चार महिन्यात नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारीपर्यंत या चार महिन्यांतच सर्दी, खोकल्याचे १०६९ तर तापाचे ८४८ रुग्ण आढळून आले आहेत. याची दक्षता घेत उपाययोजना ही करण्यात येत आहेत, अशी माहिती उरण पंचायत समितीचे तालुका आरोग्याधिकारी डॉ.वंदन कुमार पाटील यांनी दिली.

उरण येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र आदी दोन्ही रुग्णालयात मागील चार महिन्यात एकूण सर्दी, खोकला, तापाच्या एकूण ११ हजार ३७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.

# हिंद-दी-चादर समागमात लाखो भाविकांनी घेतला लंगरसेवेचा लाभ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त खारघर येथे आयोजित कार्यक्रमात भाविकांसाठी भव्य लंगरची व्यवस्था करण्यात आली आहे. लाखो भाविक या लंगर सेवेचा लाभ घेत असून संपूर्ण परिसर सेवाभाव आणि समतेच्या संदेशाने भारावून गेला आहे. पहिल्या दिवशी अंदाजे दोन लाखांपेक्षा अधिक भाविकांनी लंगर सेवेचा लाभ घेतल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर व्यवस्था सुरू असून सर्व धर्मीय भाविकांना भोजन दिले जात आहे. संपूर्ण परिसरात आठ ठिकाणी लंगर सुरू असून एका वेळेस एका लंगर मध्ये सुमारे दोन ते अडीच हजार भाविकांना एकत्रितपणे भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत अखंडपणे भोजन व्यवस्था सुरू असून स्वयंसेवक आणि सेवाभावी संस्थांच्या मदतीने वाढप, स्वच्छता व व्यवस्थापन सुरळीत पार पडत आहे.

स्वयंसेवक, सेवाभावी संस्था आणि गुरुद्वारातील सेवादार यांच्या संयुक्त प्रयत्नातून अन्न तयार करणे, वाढप, स्वच्छता आणि व्यवस्थापनाची चोख



जबाबदारी पार पाडली जात आहे. लंगरमध्ये पारंपरिक पद्धतीने रोटी, भाजी, डाळ, भात तसेच गोड पदार्थांची व्यवस्था करण्यात आली आहे. हजारो स्वयंसेवक सेवेत सहभागी झाले असून 'सेवा' हीच खरी श्रद्धा असल्याचा संदेश या माध्यमातून दिला जात आहे.

या समागमात गुरु ग्रंथ साहिब यांच्या पावन उपस्थितीत कीर्तन सुरू असून वाहे गुरु व बोले सो निहाल सत श्री अकालच्या जयघोषात भाविक दर्शन व लंगर सेवेचा लाभ घेत आहेत. लंगर ही केवळ भोजन व्यवस्था नसून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ आयोजित या कार्यक्रमातून समाजात एकात्मतेचा संदेश दिला जात आहे.

# उरणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजस्व विशेष महसूल सप्ताह

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात महसूल व वन विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची पुर्व तयारी व अंमलबजावणी करण्यासाठी विशेष महसूल सप्ताहाच्या आयोजनाला प्रारंभ झाला आहे. शेतकरी व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे.

मागील वर्षी एक ऑगस्टपासून सुरू झालेल्या महसूल विभागाशी संबंधित सेवा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी काही प्रभावी धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत.यामध्ये प्रामुख्याने अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची आवश्यक नसणे, सनद प्रणाली संपुष्टात आणणे, एक वेळचे अधिमुल्य भरण्याची नवीन तरतूद, तुकडेबंदी कायद्यांतील सुधारणा व अभिलेख अद्ययावतीकरण आदी विविध सुधारणांचे लाभ सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी

विशेष महसूल अभियान नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जनजागृती, प्रसार व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने उरण तालुक्यातही महसूल व वन विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची २८ फेब्रुवारीपासून ५ मार्चपर्यंत पुर्व तयारीचा व अंमलबजावणी करण्यासाठी विशेष महसूल सप्ताहाच्या आयोजनाला सुरुवात केली आहे.

या छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत येणाऱ्या पहिल्या टप्प्यात उरण तालुक्यातील ७ मार्च रोजी चाणजे -उरण, १४ मार्च रोजी जासई, १० एप्रिल रोजी कोप्रोली,१७ एप्रिल रोजी जासई-वेश्वी, ८ मे रोजी उरण,१५ मे रोजी म्हातवली-उरण या महसुली मंडळानिहाय नियोजन आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली. शेतकरी व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी यानिमित्ताने केले आहे.

# एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत गव्हाण विद्यालयाचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या वतीने दरवर्षी देशातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी एनएमएमएस या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये गव्हाण विद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन विद्यालयाच्या यशाची कमान उंचावली आहे. यापैकी जे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरतील त्यांना प्रत्येकी १२००० रुपये प्रतिवर्ष याप्रमाणे सलग चार वर्षे ४८००० रुपये शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये कोळी तन्मय वैभव, ठाकूर हंसिका अशोक, कोळी आरोही संतोष, म्हात्रे शर्वरी ऋषिकेश, कोळी श्रावणी विनोद, मोकल स्मित कुंदन, पाटील अनुज मनोज, शिरसाट कोमल पिराजी, लोखंडे प्रज्ञा दत्ता, कोरेकर प्रज्वल प्रशांत,आगिवले प्रथमेश किशोर, पाटील सुदर्शन शशिकांत आदींचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, शशिकला पाटील, रवींद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे आदींनी अभिनंदन केले. या शिष्यवृत्ती विभागाचे मार्गदर्शक वृषाली म्हात्रे, शितलकुमार म्हात्रे, विशांत ठाकूर, प्रशांत परदेशी, सुजाता शेलार यांचेही अभिनंदन होत आहे.

# महिला उद्योग मंडळाच्या शाळेत विद्यार्थ्यांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे व शिशुविकास बालमंदिर मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने बक्षीस वितरण समारंभाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पाडण्यात आला.

यावेळी मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, उपाध्यक्ष शारदा दराडे, सचिव सुनंदा कुलकर्णी, उपसचिव नेपाळी, खजिनदार कराड, सदस्या हर्षदा पालव, शोभा देऊळगावकर तसेच वासांबे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच ताई पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, ईशस्तवन व स्वागत पद्याने झाली.

विविध वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धा मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना मान्यवरांनी सातत्य परिश्रम व आत्मविश्वासाचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

शाळेच्या मुख्याध्यापक महादेव पाटील सरांनी क्रीडा स्पर्धांचे अभ्यासक्रमातील व जीवनातील महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने क्रीडा स्पर्धा खेळल्या म्हणून त्यांचे कौतुक केले.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बालसभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये ज्ञानपीठ पारितोषिक विजेते साहित्यिक कविवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून इयत्ता पाचवी ब या वर्गाच्या वतीने बालसभा भरवून उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला.

उपमुख्याध्यापक विलास लेंभे यांच्या हस्ते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राजेंद्र चौधरी, गमहेश म्हात्रे, मोनालिसा बाबर, सागर रंधवे, सुरेश पारखे, हर्षला पाटील, सारिका ठाकूर, रंजिता मुंबईकर, दर्शना माळी, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

सायंकाळी विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या बालसभेत पूर्वा दारकुंडे, मही माने, अनुष्का पवार, सम्राट ढवळे यांची भाषणे झाली तर कार्तिकी कोळी हिने कविवर्य कुसुमाग्रज यांची 'कणा' ही कविता सादर केली.

इयत्ता पाचवी ब मधील विद्यार्थ्यांनी 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी' या गीताचे गायन केले. शशिकला पाटील व हर्षला पाटील यांचीही भाषणे झाली. विशाल ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले तर क्रिश रत्ने या विद्यार्थ्याने आभार मानले.

# जेएनपीए विद्यालयात मराठी राजभाषा दिन

**उरण : बातमीदार**

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात अगदी शाही थाटात झाली मनोहर टेमकर आणि विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या विद्यालयाच्या लेझीम पथकाच्या सादरीकरणाने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

सुलेखनकार मनोहर जामकर यांच्या हस्ते लाल फीत कापून सुलेखन प्रदर्शनाचे उद्घाटन



करण्यात आले. कार्यक्रमाच्या स्वागताचा फलक किशोर म्हात्रे यांनी सुंदर आणि मोहक अक्षरात रेखाटला होता जो सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध सुलेखनकार मनोहर जामकर यांचे सुलेखन (कॅलिग्राफी) प्रदर्शन ठरले. जामकर यांनी विद्यार्थ्यांना अक्षरांचे सौंदर्य प्रत्यक्ष कृतीतून दाखवले ज्यामध्ये विद्यार्थी पूर्णपणे रमून गेले होते.

याप्रसंगी शालेय प्रशासकीय अधिकारी मोनिका रतनपर्ज, पालक संघाचे उपाध्यक्ष रमाकांत म्हात्रे, अविनाश म्हात्रे सहसचिव योगेश तांडेल आणि पत्रकार तृप्ती भोईर उपस्थित होत्या. विद्यालयाचे मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, अंकुश जोगळे आणि बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे, पर्यवेक्षक जगदीश मढवी, चंदा टेमकर व सहकारी शिक्षकांच्या अचूक नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत देखणा आणि यशस्वी ठरला.

# 'सीकेटी'मध्ये ग्रंथदिंडी, पालखी मिरवणूक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यम-माध्यमिक विभाग विद्यालयात शुक्रवारी (दि. २७) 'मराठी राजभाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत ग्रंथदिंडी, पालखी मिरवणूक, विद्यार्थ्यांचे लेझीम पथक जल्लोषात फिरवण्यात आले.

मुख्याध्यापक कैलास सत्रे आणि पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठ साहित्यिक कवीश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते.



**उरण : नगर परिषदेच्या माँसाहेब मिनाताई ठाकरे ग्रंथालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून एमपीएससी, यूपीएससी, सीए परीक्षा, पोलीस भरती यांची अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. येथे मराठी भाषा गौरव दिनप्रित्यर्थ संतोष पवार व अॅड. निरंतर सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.**

# युईएस स्कूल आणि कॉलेजमध्ये मराठी दिवस

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये मराठी दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे, उदयोजक गणेश भगवान नाखवा, यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका यांचे विदयार्थ्यांनी लेझिम नृत्य करुन ढोलताश्यांच्या गजरात स्वागत केले तसेच प्रमुख पाहुण्यांचे व सर्व मान्यवरांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करण्यात आले.

ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया ह्यांनी सर्वांना मराठी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर ह्यांनीही मराठी दिवसाचे महत्त्व सांगितले. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शिवकालीन खेळांचे प्रात्यक्षिके तसेच कोळीनृत्य सादर केले. तर उच्च महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही सोशल मिडीया ह्या विषयावर आधारीत पथनाट्य सादर केले.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी ग्रंथालय समितीच्या वतीने 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि साहित्य वारसा याविषयी मार्गदर्शनपर भाषणे झाली. महाविद्यालयातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून संस्कृती, विचार आणि अस्मितेची ओळख असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमांमध्ये ग्रंथालयात मराठी साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमामुळे मराठी भाषेविषयी अभिमानाची भावना अधिक दृढ झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागण्यास नक्कीच मदत होणार आहे, असे मत महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच ग्रंथालय समितीची इतर सर्व सदस्य शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# महाड नगर परिषदेचा एक कोटी ८१ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**महाड : प्रतिनिधी**



ऐतिहासिक महाड नगर परिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा एक कोटी ८१ लाख १७ हजार ७८१ रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला. अंदाजपत्रकाचे सविस्तर वाचन श्री. वडके यांनी केले.

चालू वर्षात चवदार तळे सौंदर्यीकरण, अमृत २.० योजना, रस्ता अनुदान, वैशिष्ट्यपूर्ण अनुदान तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत अपेक्षित निधी व खर्च गृहीत धरून अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. मागील शिल्लक ९४ लाख ५३ हजार ९८१ रुपये आणि सन २०२६-२७ साठी अंदाजित जमा २१७ कोटी २४ लाख ४१ हजार ९९२ रुपये मिळून एकूण जमा २१८ कोटी १४ लाख ९५ हजार ९७३ रुपये अपेक्षित आहेत. त्यातून एकूण अंदाजित खर्च २१६ कोटी ३७ लाख ७८ हजार ९१२ रुपये वजा जाता अखेर एक कोटी ८१ लाख १७ हजार ७८१ रुपयांची शिल्लक राहणार आहे. सभेच्या सुरुवातीस नगराध्यक्ष कविस्कर यांनी सर्व सदस्यांना अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्याचे आवाहन केले.

अर्थसंकल्पात शहरवासीयांच्या विम्यासाठी १५ लाख, महाड महोत्सवासाठी पाच लाख तसेच कला, क्रीडा, शिक्षण व पत्रकारिता क्षेत्रातील व्यक्तींना महाडभूषण पुरस्कारासाठी दोन लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सभेत थकीत घरपट्टी व पाणीपट्टीधारकांची नावे जाहीर करून वसुली करण्याची मागणी करण्यात आली. रमाई विहारचा वापर बाहेरील व्यक्तींमार्फत होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मच्छी मार्केटबाहेरील विक्रेत्यांकडून पालिकेची वीज वापरली जात असून त्याचा मोबदला घेतला जात नसल्याने संबंधितांकडून वसुली करावी; अन्यथा वीजपुरवठा बंद करावा, अशी मागणीही करण्यात आली तसेच महाड स्मशानभूमीतील दहनवाहिनी व शेड दुरुस्तीची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. एमआयडीसीची थकीत पाणीपट्टीबाबत चर्चा झाली.

उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी महाड एमआयडीसीकडे नगर परिषदेची २९ कोटी ४३ लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत असल्याचे सांगितले. त्यापैकी १७ कोटी रुपये उद्योगमंत्री उदय सामंत यांनी माफ केल्याबद्दल अभिनंदन केले, मात्र या माफीसंदर्भात उद्योग विभागाकडून अधिकृत पत्रव्यवहार झालेला नसल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. शासनाच्या अभय योजनेंतर्गत उर्वरित पाणीपट्टी माफीसाठी प्रस्ताव सादर करण्याची सूचनाही करण्यात आली. यावर नगराध्यक्ष कविस्कर यांनी उद्योगमंत्री सामंत यांनी आणखी दोन कोटी रुपये माफ करण्याचे दिल्याचे सांगितले. या संदर्भात उद्योगमंत्र्यांची भेट घेऊन एमआयडीसीला करावयाचा पत्रव्यवहार व पालिकेचा ठराव याबाबत सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी केले.

या सभेला उपनगराध्यक्ष संदीप जाधव, मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, बांधकाम सभापती सुमित पवार, आरोग्य सभापती महेश शेडगे, पाणीपुरवठा सभापती वजीर कोंडीवकर, महिला व बालकल्याण सभापती गीतांजली महाडीक यांच्यासह सर्व नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते.

# आला उन्हाळा..., विद्यार्थ्यांनो तब्येत सांभाळा!

- परीक्षांच्या पार्श्वभूमीवर तज्ज्ञांचा सल्ला
- पालकांनाही खबरदारी घेण्याचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

फेब्रुवारी-मार्च महिन्यात वाढणारे तापमान आणि त्याच काळात येणाऱ्या शालेय वार्षिक परीक्षा यामुळे विद्यार्थ्यांवर दुहेरी ताण निर्माण होत आहे. एका बाजूला कडक उन्हामुळे शारीरिक थकवा, डोकेदुखी, निर्जलीकरण (डिहायड्रेशन) यांसारख्या तक्रारी वाढत आहेत, तर दुसऱ्या बाजूला अभ्यासाचा व निकालाचा मानसिक ताणही जाणवत आहे.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते दुपारच्या सत्रात परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना उष्माघाताचा धोका अधिक असतो. पुरेसे पाणी न पिणे, उपाशीपोटी घराबाहेर पडणे किंवा जड, तेलकट आहार घेणे यामुळे अशक्तपणा जाणवू शकतो. त्यामुळे परीक्षा काळात हलका, पचायला सोपा आणि पौष्टिक आहार विद्यार्थ्यांनी घ्यावा. सकाळी नाश्त्यात फळे, दूध, ताक किंवा लिंबूपाणी घ्यावे. कलिंगड, खरबूज, काकडी यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे आहारात समाविष्ट करावीत. जंक फूड, कोल्ड ड्रिंक्स व अति तिखट पदार्थ टाळावेत. परीक्षा केंद्रावर पाण्याची बाटली घेऊन जाण्याची परवानगी असल्यास सोबत ठेवावी.

परीक्षेच्या काळात पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचा ताण टाकू नये. सकारात्मक वातावरण, प्रोत्साहन व भावनिक आधार देणे अधिक उपयुक्त ठरते.

उन्हाळ्याचे वाढते चटके आणि परीक्षेचा ताण या दोन्हींचा समतोल राखत विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेतली, तर यश नक्कीच गाठता येईल. आरोग्य चांगले, तरच निकाल उज्ज्वल हे सूत्र लक्षात ठेवूनच या परीक्षा पर्वाला सामोरे जाण्याची गरज आहे.

### मानसिक ताण असा कमी करा

***मानसशास्त्रज्ञांच्या मते पेपर कसा जाईल? या चिंतेपेक्षा आपण केलेला अभ्यास सर्वोत्तम पद्धतीने मांडायचा यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. दर ४५-५० मिनिटांच्या अभ्यासा नंतर ५-१० मिनिटे विश्रांती घ्यावी. पुरेशी झोप किमान ७-८ तास परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे. मोबाईल व सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवावा.***

# महावितरणच्या नेरळ उपविभागाला मंजुरी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वाचा निर्णय जाहीर झाला असून विद्युत महावितरणकडून नेरळ उपविभाग स्थापन करण्यास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे परिसरातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम होणार आहे.

महावितरणच्या अधिकृत आदेशानुसार पनवेल ग्रामीण विभागातील कर्जत उपविभागाचे विभाजन करून नव्याने नेरळ उपविभाग निर्माण करण्यात येणार आहे. या नव्या उपविभागांतर्गत एकूण १२ पदांना मंजुरी देण्यात आली असून त्यामध्ये उपकार्यकारी अभियंता (वितरण), कनिष्ठ अभियंता, लिपिकवर्ग, सहाय्यक अभियंता, मुख्य तंत्रज्ञ, शिपाई आदी पदांचा समावेश आहे.

विभाजनानंतर कर्जत शहर, दहिवली-१, दहिवली-२ व काडव या शाखा विद्यमान कर्जत उपविभागाकडे राहणार आहेत; तर नेरळ-१, नेरळ-२, माथेरान, कळंब आणि शेलू या शाखा नव्या नेरळ उपविभागांतर्गत कार्यरत राहतील. त्यामुळे वाढत्या ग्राहकसंख्येचा ताण कमी होऊन दुरुस्ती, देखभाल आणि तक्रार निवारण प्रक्रियेला गती मिळणार आहे.

ग्रामीण भागासह नेरळ, कळंब, शेलू आणि माथेरान येथील नागरिकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. वीज संबंधित कामांसाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणार असून वेळ, आर्थिक खर्च आणि मानसिक त्रास यामध्ये बचत होणार आहे.

नवीन उपविभागाच्या पदनिर्मितीसाठी सुमारे १ कोटी २६ लाख रुपयांहून अधिक खर्चास मंजुरी देण्यात आली असून कार्यालयीन व्यवस्थेसाठीही १९ लाख ६८ हजार रुपये एवढी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

नेरळ उपविभागाच्या स्थापनेमुळे स्थानिकांना जलद सेवा, कमी विलंब आणि अधिक प्रभावी वीज व्यवस्थापनाचा लाभ मिळणार असून विकासाला नवे बळ मिळणार आहे.

# कर्जत एसटी आगारात मराठी भाषा दिन साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत एसटी आगारात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आले. यावेळी 'अन्य भाषा जरूर शिका परंतु आपल्या मराठी भाषेचा विसर पडू देऊ नका.' असे आवाहन करण्यात आले.

कर्जत एसटी आगाराच्या सांभागृहात मराठी भाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. वाहतुक नियंत्रक दीपक देशमुख यांनी वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. चालक सांजाबराव बोरकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास मेधा भरकले, संगीता शिरगिरे, अनुजा सुरावकर, केशव आंधळे, शार्दूल शेख, विलास बागुल, संजय कोंडार, नागेश भरकले, अरुण थोराड, निकिता शेट्टी आदी उपस्थित होते.

या वेळी मराठी ही आपली भाषा आहे. आपण तीला जपले पाहिजे. शक्यतो सर्व ठिकाणी बोलताना मराठी भाषेतच बोलले पाहिजे. आपली मुले जरी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असली तरी त्यांचे मराठी चांगले व्हावे. यासाठी पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. मराठी शाळेत शिकलेले किती मोठे झाले आहेत. हे आपल्याला माहीतच आहे. त्यामुळे मराठीवर प्रेम करा, असा सल्ला मान्यवरांनी दिला.

# माणगावात गुरू तेग बहादूर यांचा शहीद दिन

**माणगाव : प्रतिनिधी**



हिंद दी चादर, शिख धर्मीय गुरुंचे गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहीद दिनानिमित्त माणगाव येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगरपंचायत, श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल, विवा कॉलेज, शिख सेवा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून गुरुंच्या महान बलिदानाला अभिवादन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, सिटी को-ऑर्डिनेटर अतुल जाधव, केंद्र प्रमुख शंकर शिंदे, श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका बिजाक्षी हेगडे, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे आदी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते भूषण व कविता तांबे यांचाही या कार्यक्रमात सहभाग होता.

सोहळा यशस्वी करण्यासाठी शिख सेवा असोसिएशन आणि चारिझेन फाउंडेशनच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कॅप्टन निर्मल सिंग रंधवा,सुरेंद्र सिंग बर्मन, वरेंदर सिंग बर्मन, सनप्रीत सिंग बर्मन, गुरविंदर सिंग सोडी, गुरविंदर सिंग भाटिया, सुरेंद्र सिंग भाटिया यांनी सक्रीय सहभाग घेतला.

प्रास्ताविक कुंभे शाळेचे मुख्याध्यापक योगेश शेलार यांनी करून कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कॅप्टन निर्मल सिंग रंधवा यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# श्रीवर्धन येथे रक्तदान शिबिर व जनजागृती

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत आरोग्यविषयक जनजागृतीचा व्यापक संदेश देण्यासाठी श्रीवर्धन कुणबी समाजोन्नती संघातर्फे भव्य रक्तदान शिबिर व समाज जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजातील ऐक्य, परस्पर सहकार्य आणि मानवतावादी दृष्टिकोन अधिक दृढ व्हावा, या हेतूने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहे.

कुणबी समाजाचे नेते थोर समाजसुधारक कै. ग. स. कातकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची परंपरा पुढे चालविण्याच्या उद्देशाने रविवार (दि.८ मार्च) रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश समाजात रुजविण्याचा संघाचा प्रयत्न असून जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिबिरात महिलांच्या आरोग्याविषयी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विविध स्त्रीरोग, त्यावरील उपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्य तपासणी याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन केले जाणार आहे.

यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. मधुकर ढवळे उपस्थित राहून महिलांना सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. ग्रामीण भागातील महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

याशिवाय उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे रुग्णांना फळवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक तसेच मुंबईस्थित कार्यकर्त्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून रक्तदात्यांच्या प्रवास व अल्पोपहाराची योग्य व्यवस्था करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समाजबांधवांनी सहकार्य करावे, असे आवाहन अध्यक्ष सीताराम साळवी यांनी केले आहे.

# लोणेरे विद्यापीठाच्या केंद्राला दूरसंचार विभागाची भेट



**माणगाव : बातमीदार**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील डीएफआयआयई केंद्र येथे दूरसंचार विभागाच्या सहाय्यक संचालक (तंत्रज्ञान) सुमित्रा सरडा यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, स्टार्टअप उपक्रम, नवोपक्रम आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रतिनिधी प्रा. बोंडे व राजनिकांत सर उपस्थित होते. त्यांनी विभागातील संशोधन कार्य, विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप कल्पना तसेच उद्योग-संलग्न प्रकल्पांविषयी माहिती सादर केली. दूरसंचार व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञान संधींबाबतही चर्चा करण्यात आली.

डीएफआयआयई केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश काकडे यांनी केंद्राच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा आढावा सादर केला. त्यांनी विविध शासकीय योजना, स्टार्टअपसाठी उपलब्ध सुविधा, इनक्युबेशन समर्थन, आर्थिक सहाय्य तसेच तांत्रिक मार्गदर्शन याविषयी सविस्तर माहिती दिली.

सुमित्रा सरडा यांनी केंद्राच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी, उद्योग-संस्थांशी समन्वय आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याबाबत मार्गदर्शन केले.

# तळाघर शाळेत भरला आठवडा बाजार

## विद्यार्थ्यांकडून ३५ ते ४० हजार रुपयांची उलाढाल

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील राजीप शाळेच्या तळघर परिसरात विद्यार्थ्यांनी भरवलेला आठवडा बाजार उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आर्थिक व्यवहार, बाजारमूल्य तसेच दैनंदिन जीवनातील व्यवहारांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे या उद्देशाने शाळेच्या मैदानावर हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला होता.


शाळेचे मुख्याध्यापक विलास सुटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षक पल्लवी गायकर, निकिता धूपकर, आकांक्षा मेहतर मॅडम आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी हा बाजार भरवला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, पैशाचे नियोजन, ग्राहकांशी संवाद आणि विक्री व्यवस्थापन याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

आठवडा बाजारात विद्यार्थ्यांनी गावठी भाज्या, फळे, फुले, कडधान्ये, बोरं, गावठी वाल-मटकी, शेकटाच्या शेंगा तसेच दैनंदिन जीवनातील विविध वस्तूंची दुकाने आकर्षक पद्धतीने सजवली होती. ग्राहकांसाठी योग्य व्यवस्था, बाहेरील दिशादर्शक फलक तसेच विद्यार्थ्यांची लगबग पाहून अनेक ग्रामस्थांनी खरेदीचा आनंद घेतला. त्यामुळे या बाजारात सुमारे ३५ ते ४० हजार रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश कांबळे यांनी दिली.

यावेळी मुख्याध्यापक विलास सुटे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांपुरते शिक्षण न घेता प्रत्यक्ष अनुभवातून जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी शिकाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या आठवडा बाजाराला लांढर शाळेचे मुख्याध्यापक शरद पाटील, केंद्रप्रमुख गायकर सर, किल्ला शाळेचे मुख्याध्यापक, धाटाव केंद्रातील शिक्षक तसेच व्यावसायिक यशवंत मोरे, मच्छिंद्र मोरे, अविनाश भगत, वृषिकेश माने, धीरज मोडे, दत्ताराम मोरे, सागर माने, निलेश भगत, अनिशय मोरे आदींनी भेट दिली.

शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा आठवडा बाजार उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.



# करिअर कट्टा कार्यक्रमात तटकरे महाविद्यालयाचे यश

**माणगाव : प्रतिनिधी**



राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि सेंट झेवियर्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या राज्यस्तरीय उपक्रमात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ माणगावच्या द.ग. तटकरे महाविद्यालयाने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.

यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाविद्यालयाला उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय प्रथम क्रमांक,उत्कृष्ट जिल्हास्तरीय संसद प्रथम पुरस्कार, सोलार एनर्जी अवेअरनेस २०२५ प्रशिक्षण अभियान द्वितीय क्रमांक अशा पुरस्कारांनी गौरविण्यात आले. याचबरोबर महाविद्यालयाचे मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिनगारे यांना उत्कृष्ट मुंबई विभागीय सहसमन्वयक हा सन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे रवींद्र साठे तसेच करिअर कट्टा सर्वेसर्वा व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य, करिअर कट्टा सहसमन्वयक डॉ. नमिता मोरे, महाविद्यालय समन्वयक तसेच मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिनगारे यांनी सन्मान स्वीकारला.

# तहसीलदारांकडून बीडीओ कराड यांचे कौतुक

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान ५.०मध्ये उत्कृष्ट काम केल्याने खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांचा राज्यात प्रथम क्रमांक आला आहे. याबद्दल तहसीलदार अभय चव्हाण यांनी त्यांचा सन्मान केला.

ग्रुप ग्रामपंचायत वडगाव येथे प्रशासकीय राजवट आहे, लोकनियुक्त सदस्य नसल्याने स्वतः गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी येथील ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासक यांना विश्वासात घेऊन ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधला. गावच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने हे अभियान किती महत्वाचे आहे याची माहिती त्यांनी ग्रामस्थ व या अभियानाशी संबंधित कार्यक्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी यांना विश्वासात घेऊन ही योजना यशस्वी केली. त्यामुळे ग्रामपंचायतीला पाच ते दहा हजार गटात प्रथम क्रमांक मिळाला. याबद्दल राज्यपाल आचार्य देवव्रत आणि पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते मुंबई येथे सत्करार करण्यात आल.

याशिवाय खालापूर तालुक्यातील आठ ग्रामपंचायतींनी नऊ बक्षिसे जिंकली. याबद्दल तहसीलदार अभय चव्हाण यांनी एका छोटेखानी कार्यक्रमात सत्कार केला. कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जम्मू काश्मीर संघाने इतिहास रचला

## आठ वेळा चॅम्पियन असणाऱ्या कर्नाटकला हरवून रणजी ट्रॉफी जिंकली

**हुबळी : वृत्तसंस्था**

फलंदाजी आणि गोलंदाजीतील दिमाखदार कामगिरीच्या जोरावर पाचव्या व अखेरच्या दिवशी सामना अनिर्णित राखून जम्मू काश्मीरच्या संघाने पहिल्यांदाच रणजी ट्रॉफीवर आपले नाव कोरले. ६६ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा फायनल खेळताना जम्मू काश्मीरच्या संघाने पहिलीवहिली रणजी ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्नही साकार केले आहे.

हुबळी येथील कर्नाटक क्रिकेट असोसिएशनच्या मैदानात जम्मू काश्मीर आणि कर्नाटक यांच्यात देशांतर्गत क्रिकेटमधील प्रतिष्ठित स्पर्धा असलेल्या रणजी करंडक स्पर्धेतील अंतिम सामना खेळवण्यात आला. आठ वेळच्या रणजी चॅम्पियन कर्नाटक संघात टीम इंडियातील लोकेश राहुल, देवदत्त पडिक्कल, करुण नायर आणि मयंक अग्रवालसह प्रसिद्ध कृष्णा यासारखे स्टार होते, पण या संघाचे जम्मू काश्मीरच्या पठ्ठ्यांसमोर काहीच चालले नाही.

सलामीवीर कामरान इक्बाल याने ३११ चेंडूत केलेल्या नाबाद १६० धावा आणि साहिल लोटराच्या २२६ चेंडूतील १०१ धावांच्या खेळीसह जम्मू काश्मीरने दुसऱ्या डावात चार विकेट्सच्या मोबदल्यात ३४२ धावा केल्या. पाचव्या दिवशी सामना अनिर्णि राहिला अन् रणजी करंडक स्पर्धेतील नियमानुसार मजबूत आघाडीच्या जोरावर जम्मू काश्मीरचा संघ यंदाच्या स्पर्धेतील हंगामाचा विजेता ठरला. जम्मूच्या संघाने दुसऱ्या डावातही दमदार फलंदाजी करत कर्नाटकच्या संघाला फिल्डिंग करून तंगवल्याचे पहायला मिळाले.



### गौलंदाजीत औकिब नबीचा कहर

*जम्मू काश्मीरच्या संघाकडून गोलंदाजीत औकिब नबी याने कमालीची गोलंदाजी करताना २३ षटकात ५४ धावा खर्च करत कर्नाटकचा अर्धा संघ तंबूत धाडला. याशिवाय सुनील कुमार, युधवीर चरक यांनी प्रत्येकी दोन, तर साहिल लोटरा याने एक विकेट घेत संघाला ऐतिहासिक जेतेपद मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.*

नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करताना शुभम पुंडीर १२१ (२४७) याच्या शतकी खेळीशिवाय कर्णधार पारस डोगरा ७० (१६६), यामेर हसन ८८ (१५०), अब्दुल समद ६१ (१०४), कन्हैया वाधवान ७० (१०९ ) आणि साहिल लोत्रा यांच्या अर्धशतकाच्या जोरावर जम्मू काश्मीरच्या संघाने पहिल्या डावात ५८४ धावा केल्या होत्या. याधावसंख्येचा पाठलाग करताना मयंक अग्रवालने २६६ चेंडूत केलेली १६० धावांची खेळी वगळता कर्नाटकच्या ताफ्यातील एकालाही मोठी धावसंख्या करता आली नाही. परिणामी कर्नाटकचा पहिला डाव २९३ धावांत आटोपला. जम्मू काश्मीरच्या संघाने पहिल्या डावात २९१ धावांची आघाडी मिळवल्यावर यंदाच्या हंगामात नवा विजेता मिळणार हे जवळपास निश्चित झाले होते. पाचव्या दिवशी जम्मू काश्मीरच्या संघाने दुसऱ्या डावात दोघांनी शतके झळकावत दिमाखात यावर शिक्कामोर्तब केले.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ उपविजेता

**वडोदरा : वृत्तसंस्था**



महाराष्ट्राने ७२व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत धडक दिली, पण त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. गुजरातच्या वडोदरा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुल येथे झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघ हा रेल्वेकडून ३१-४९ असा पराभूत झाला.

हरियाणा येथे २०२२ साली झालेल्या ६८व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेतदेखील महाराष्ट्र हा सेनादलाकडून पराभूत झाला होता. हैदराबाद येथे २०१७ साली झालेल्या विजयाची पुनरावृत्ती करण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला. भारतीय रेल्वेचे स्पर्धेत सहभाग (१९५९) घेतल्यापासूनचे हे २५वे जेतेपद. १९६१ सालापासून महाराष्ट्राची अंतिम फेरी गाठण्याची ही २१वी वेळ. आपण फक्त आठवेळा जेतेपद मिळविले.

महाराष्ट्राने झोकात सुरुवात करीत रेल्वेवर पहिला लोण देत १८-१३ अशी आघाडी घेतली, पण लोणची परतफेड करीत रेल्वेने २२-१८ अशी आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. याच गुणावर सामन्याचा मध्यंतर झाला. दुसऱ्या डावात मात्र रेल्वेने आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी चढईत २१ गुण, यशस्वी पकडी करीत १४ गुण, पाच बोनस गुण मिळवत महाराष्ट्रावर बाजी पलटविली.

महाराष्ट्राला चढाईत १२ गुण, पकडीत १३ व तीन बोनस गुण घेता आले. तसे पाहिले असता महाराष्ट्र विरुद्ध महाराष्ट्र असाच हा सामना झाला. पंकज मोहिते, शुभम शिंदे, अजिंक्य पवार यांच्या खेळण्याने रेल्वेचा संघ वरचढ ठरला. महाराष्ट्राच्या शिवम पठारे यांनी एकाकी लढत दिली.

## आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये उरणच्या विनायक घरतची 'सोनेरी' कामगिरी

### ■ पाच सुवर्णपदके पटकाविली



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण नागाव येथील विनायक मंगेश घरत याने आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत पाच सुवर्णपदके जिंकून नेत्रदीपक यश मिळविले आहे. याबद्दल सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टिंग फेडरेशनने (डब्ल्यूआरपीएफ) नुकतेच नवी दिल्लीतील शाह ऑडिटोरियममध्ये आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपचे आयोजन केले होते. या स्पर्धेत उरणजवळील नागाव येथील विनायक घरत याने ज्युनियर १२०+ पुरुष गटात पाच सुवर्णपदके जिंकली.

विनायक घरतने स्क्वॅट्स, बेंच, डेडलिफ्ट, एकूण आणि पूर्ण पॉवरलिफ्टिंग अशा एकूण पाच सुर्णपदकांवर नाव कोरले. या यशाबद्दल उरणचे आमदार महेश बालदी यांच्यासह परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, आप्तेष्टांनी विनायकचे अभिनंदन केले.

## धोनीला हाऊसिंग बोर्डाची नोटीस

**रांची :** भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला झारखंड स्टेट हाऊसिंग बोर्डाने नियमभंग केल्यामुळे नोटीस बजावली आहे. रांचीतील हरमू रोड परिसरात निवासी वापरासाठी देण्यात आलेल्या प्लॉटचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होत असल्याचा आरोप बोर्डाने केला आहे.

झारखंड स्टेट हाऊसिंग बोर्डाकडून धोनीला काही वर्षांपूर्वी निवासी वापरासाठी एक प्लॉट देण्यात आला होता. अशा प्लॉट्सवर केवळ राहण्यासाठी घर बांधणे आणि त्याचा निवासी वापर करणे ही अट असते, मात्र त्या जागेचा व्यावसायिक वापर होत असल्याचे दिसून आल्याचा दावा बोर्डाने केला आहे.

## 'एमसीए'कडून पंच विनीत कुलकर्णी, अध्यक्ष अजय देशपांडे यांची नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) आयोजित वरिष्ठ गटाच्या दोन दिवसीय कसोटी फॉरमॅटनुसार घेण्यात येणाऱ्या क्रिकेट स्पर्धेतील सामने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर होत आहे. यासाठी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर महाराष्ट्राचे पहिले युवा आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच तथा आयसीसी व बीसीसीआयचे पॅनल पंच विनीत कुलकर्णी आणि महाराष्ट्र क्रिकेट पंच मंडळ अध्यक्ष अजय देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.





रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) पुढाकाराने एमसीएच्या सामन्यांचे आयोजन रायगड जिल्ह्यातील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, रसायनी येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्सचे मैदान, गव्हाण उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, बेलापूर येथील सिडकोच्या मैदानावर करण्यात आले आहे. एमसीएच्या वतीने विनीत कुलकर्णी आणि अजय देशपांडे या दोन दिग्गज व्यक्तींची नियुक्ती सध्या रायगड जिल्ह्यातील मैदानाच्या व खेळपट्टीच्या स्तराची व दर्जाची पाहणी करण्यासाठी केली गेली आहे.

पेणच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आरडीसीएच्या वतीने रविवारी (दि.१) आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच विनीत कुलकर्णी आणि महाराष्ट्र क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष अजय देशपांडे यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## टी-२० विश्वचषकात आज भारत-विंडीज लढत

**कोलकाता : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकात उपांत्य फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी भारतीय संघ रविवारी (दि. १) वेस्ट इंडिजशी भिडणार आहे. वेस्ट इंडिजच्या संघात एकापेक्षा एक खतरनाक खेळाडू असल्याने भारतासमोर त्यांचे आव्हान असेल.

टी-२० विश्वचषकाचा थरार आता निर्णायक टप्प्यावर पोहचला असून उपांत्य फेरीच्या एका जागेसाठी दोन बलाढ्य संघ एकमेकांशी भिडणार आहेत. आयसीसी क्रमवारीत भारत पहिल्या, तर वेस्ट इंडिज सातव्या क्रमांकावर आहे, मात्र विश्वचषकाच्या इतिहासात वेस्ट इंडिजचे पारडे जड राहिले आहे. टी-२० विश्वचषकात आतापर्यंत दोन्ही संघ चार वेळा भिडले आहेत, ज्यापैकी तीन वेळा विंडीजने बाजी मारली आहे. भारताने १२ वर्षांपूर्वी २०१४मध्ये ढाका येथे विंडीजचा पराभव केला. त्यानंतर २०१६च्या उपांत्य फेरीत विंडीजने मुंबईत भारताचा पराभव करून स्पर्धबाहेर काढले होते.

भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांना या स्पर्धेत आतापर्यंत केवळ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, या दोनपैकी केवळ एकाच संघाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल.

## इंग्लंडचा 'किवीं'वर दिमाखदार विजय

### ■ जॅक्स-रेहानची मॅच विनिंग खेळी



**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या 'सुपर-८' फेरीतील थरारक लढतीत इंग्लंडने न्यूझीलंडचा चार विकेट्स आणि तीन चेंडू राखून पराभव केला. कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात विल जॅक्स आणि रेहान अहमद यांच्या तुफानी फलंदाजीच्या जोरावर इंग्लंडने न्यूझीलंडचे आव्हान धुळीस मिळवले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय इंग्लंडच्या गोलंदाजांनी चुकीचा ठरवला. सलामीवीर टिम सेफर्ट (३५) आणि फिन लन (२९) यांनी आक्रमक सुरुवात केली खरी, पण इंग्लंडच्या विल जॅक्स (२/२३), आदिल रशीद (२/२८) आणि रेहान अहमद (२/२८) या त्रिकुटाने किवी फलंदाजांना ठराविक अंतराने बाद करून धावगतीवर अंकुश ठेवला. न्यूझीलंडला २० षटकांत ७ बाद १५९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

१६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. कर्णधार जोस बटलर (०) आणि फिल सॉल्ट (२) स्वस्तात परतल्याने इंग्लंडची अवस्था २ बाद २ अशी बिकट झाली होती. हॅरी ब्रूक (२६), टॉम बँटन (३३) आणि सॅम करन (२४) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण रचिन रवींद्रने तीन बळी घेत सामन्यात रंगत आणली. इंग्लंडचा संघ ११७वर ६ बाद अशा संकटात असताना विल जॅक्स आणि रेहान अहमद या दोघांनी केवळ १६ चेंडूत ४४ धावांची अभेद्य भागीदारी करत तीन चेंडू राखून इंग्लंडला विजय मिळवून दिला.

## अतिउत्साही चाहत्यामुळे मेस्सी जमिनीवर कोसळला



**बयामोन : वृत्तसंस्था**

फुटबॉलचा सुपरस्टार लिओनेल मेस्सी पुन्हा एकदा मैदानात सुरक्षा भेदून आलेल्या चाहत्याच्या अतरंगी वागण्याचा शिकार ठरला. इंटर मियामी आणि इंडिपेंडिएन्टे डेल वैले या संघांमध्ये झालेल्या मैत्रीपूर्ण सामन्यादरम्यान एका चाहत्याने मेस्सीला मागून पकडल्यामुळे तो जमिनीवर कोसळला. सुदैवाने, या घटनेत मेस्सीला कोणतीही दुखापत झालेली नाही.


बयामोन येथील जुआन रॅमन लोब्रिएल स्टेडियमवर हा सामना रंगला होता. सामन्याच्या ८८व्या मिनिटाला एका चाहत्याने सुरक्षा यंत्रणेला चकवा देत मैदानात धाव घेतली. त्याने थेट मेस्सीपाशी जाऊन त्याच्या कमरेत घट्ट पकडले. यावेळी मेस्सीचे लक्ष नव्हते. तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकाने तत्काळ त्या चाहत्याला ओढून बाजूला करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या ओढाओढीत मेस्सी आणि तो चाहता दोघेही जमिनीवर कोसळले.

मेस्सी लगेच उठून उभा राहिला आणि मैदानाच्या दुसऱ्या बाजूला निघून गेला. संबंधित चाहत्याला मेस्सीसोबत सेल्फी घेण्याची इच्छा होती, मात्र सुरक्षा रक्षकांच्या हस्तक्षेपामुळे त्याची ही संधी हुकली. या प्रदर्शनीय सामन्यादरम्यान अनेक चाहत्यांनी मैदानात घुसण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

या मैत्रीपूर्ण सामन्यात इंटर मियामीने २-१ अशा फरकाने विजय मिळवला. मियामीकडून सँटियागो मोरालेसने १६व्या आणि लिओनेल मेस्सीने ७०व्या मिनिटाला गोल केले. विशेष म्हणजे, पायाच्या दुखापतीमुळे १३ फेब्रुवारीला होणारा हा सामना पुढे ढकलण्यात आला होता, ज्यामध्ये मेस्सीने आता दमदार पुनरागमन केले आहे.













**खारघर :** हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमाला खारघर ओवे सेक्टर १९ येथील मैदानावर शनिवारी प्रारंभ झाला. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील आदींनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com